




RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

शुक्रवार, ४ एप्रिल २०२५ | वर्ष : ५ | अंक : ९९ | दैनिक | किंमत : ₹५/-

Friday, 4 April 2025 | Year : 5 | Issue : 99 | Daily | Rate: Rs. 5/-







### बहिष्कृत भारत वर्धापन दिवस थाटात साजरा

# बहिष्कृत भारत अमर रहे ! घोषणेने परिसर दणाणून गेला !



**नागपूर :** दि. 3 एप्रिल 1927 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृत भारत वृत्तपत्र सुरू करून सामाजिक कार्याची ज्योत तेवत ठेवली होती. पाक्षिकानंतर त्यांच्या अनुयायांनी दैनिक बहुजन सौरभ सुरु करुन सामाजिक क्रांतीची ज्योत घेऊन संघर्षांची वाटचाल सुरू ठेवली आहे. या कार्याचा भाग म्हणजे दुसरा संवाद मार्च वैशाली नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान ते जयभीम चौक पर्यंत आयोजित केला अशी भूमिका सुप्रसिद्ध समाजसेवक भदंत नागदिपंकर यांनी स्पष्ट केली. दैनिक बहुजन सौरभ आयोजित बहिष्कृत भारत वर्धापन दिवस निमित्य संवाद मार्चचे आयोजन केले होते. सकाळी 7.30 वाजता नागपुरातील विविध भागातून दैनिक बहुजन सौरभचे वाचक, हितचिंतक, भागधारक, जाहिरातदार सर्व मंडळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान येथे एकत्र आले होते. भदंत नागदीपंकर यांनी बुद्ध वंदना घेऊन कार्यक्रमाचा प्रारंभ केला. बहिष्कृत भारत अमर रहे! बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे जन्मशताब्दी अमर रहे! अशा घोषणा दिल्या. बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे जन्मशताब्दी वर्षामध्ये दोन संवाद मार्च दै. बहुजन सौरभने मूकनायक वर्धापन दिवस 31 जानेवारी, दुसरा 3 एप्रिल या दिवशी संवाद मार्च घेऊन लोकांमध्ये जनजागृतीचे कार्य केले आहे. या संवाद मार्चचा मी साक्षीदार आहे. हे कार्य लाख मोलाचे आहे. असे बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे प्रतिष्ठानचे सचिव एन. टी. मेश्राम यांनी सांगितले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुरू केलेल्या मूकनायक, बहिष्कृत भारत, जनता, प्रबुद्ध भारत



यांचा वारसा घेऊन पुढे जात आहे. लेखकांनी जनजागृतीसाठी आणि लोक कार्यासाठी लेखन करावे सोबत आर्थिक सहकार्य करावे असे आवाहन ॲड. सुरेशचंद्र घाटे यांनी केले. दैनिक बहुजन सौरभ मधून आंबेडकरी चळवळीचा दबाव गट तयार होईल असे संजय फुलझले यांनी सांगितले. उत्तर नागपूर मध्ये दै. बहुजन सौरभ हा घरोघरी कसा जाईल याकरिता नियोजनबद्ध आम्ही कार्यक्रम करू आणि लवकरच या संदर्भात एका सभेचे आयोजन करू असे सुप्रसिद्ध उद्योगपती देविदास राऊत यांनी सांगितले.

दक्षिण पाश्चिम नागपुरात आम्ही दैनिक बहुजन सौरभ करिता दर सोमवारी घरोघरी जाऊन दैनिक बहुजन सौरभ लावा असे आवाहन सुरू केले आहे ही माहिती धर्मेंश प्रसेनजीत यांनी दिली. त्यानंतर संवाद मार्च यादवनगर येथील जयभीम चौकात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला मुख्य संपादक ॲड. डॉ. सिद्धार्थ कांबळे यांनी पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन केले. मूकनायक बंद झाल्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दुःख झाले ते लंडनला अभ्यासासाठी गेले. दोन वर्षानंतर भारतात आले. त्यावेळी त्यांना वृत्तपत्राची गरज भासू लागली. त्यांनी 3 एप्रिल 1927 ला मुंबई येथे बहिष्कृत भारतचा पहिला अंक प्रकाशित केला होता. याच वृत्तपत्राने सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक क्रांतीचे बिगुल फुंकले होते. बहिष्कृत भारत वृत्तपत्र आजही प्रासंगिक आहे. तर बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांची नागपूर ही कर्मभूमी होती. आमदार, नगरसेवक, महापौर, अध्यक्ष देणारा उत्तर नागपूर मतदार संघ हा बॅरि. खोब्रागडे यांचा बालेकिल्ला होता म्हणून त्यांच्या जन्मशताब्दी वर्षांत दैनिक बहुजन सौरभ घरोघरी जाईल असा विश्वास कार्यकारी संपादक विलास गजभिये यांनी व्यक्त केला.

या वर्षाप्रसंगी भदंत नागदिपंकर यांनी दहा हजार रुपयांचे दान निवासी संपादक संध्या राजूरकर यांना दिले. आभार धर्मपाल वंजारी यांनी केले.

दैनिक बहुजन सौरभचे भागधारक सखाराम मंडपे, विजय नागदेवते, ज्योत्स्ना बनसोड उपस्थित होते. नरेंद्र रामटेके, युवराज बडगे, नरेश साखरे, कृष्णराव मंडपे, विजय नागदेवे, रविंद्र राऊत, राजेश नागदेवे, लहानू बनसोड, रमेश ढवळे, नरेश वाहाणे, एस. जी. मंडपे, अशोक वारकर, रत्नमाला डोंगरे, स्मिता मेश्राम, लीना जांभुळकर, शीला देवगडे, शशी रोडगे, शितल नितनवरे, रूपाली कोटांगळे, संध्या खापर्डे, संगीता लोखंडे, नीतू मेश्राम, सीमा वासनिक, विजया नरेश रामटेके, ललिता गोंडाणे, रजनी बोरकर, प्रतिमा शेंडे, सुकेशनी नितनवरे, मनोहर खोब्रागडे, जगजीवन लाले, चरणदास रामटेके, दिलीप उके, डी. एम. वाघमारे, इंद्रपाल वाघमारे आदी उपस्थित होते. हरदास नगर अर्बन क्रेडिट को ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड व बाबु हरदास एल. एन. बहुउद्देशिय संस्था जयभीम चौक विकास समिती सिनिअर सिटिझन, आटो संघटना समुहघोष सामाजिक संस्था उद्घोष मैत्री संघ सहयोग मित्र परिवार या संघटना सहभागी झाल्या होत्या.

**काही क्षणचित्रे**

* पहाटे पासून पाऊस पडत असताना ही रेनकोट घालून नागपुरातून विविध भागातून महिला व पुरुष सहभागी झाले होते.
* वैशालीनगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर बागेत रिमझिम पाऊसात बुद्ध वंदना आणि बहिष्कृत भारत अमर रहे च्या घोषणाबाजीने परिसर दणाणून गेला होता.
* कार, स्कूटर संवाद मार्च जयभीम चौकात पोहोचला त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर नागरिक उपस्थित होते.
* जयभीम जनक बाबू हरदास एल.एन. बहुद्देशीय संस्था लष्करीबाग यांच्या सहकाऱ्याने बॅरि.राजाभाऊ खोब्रागडे आणि जयभीम जनक हरदास एल.एन. यांचे छायाचित्र प्रकाशित केले.
* दैनिक बहुजन सौरभचे भागधारक आणि लेखक यांना सहकार डायरीचे वितरण केले. संवाद मार्चमध्ये सहभागी झालेल्या सर्वांसाठी अल्पोपाहार आणि चहा पाणी व्यवस्था हरदास नगर अर्बन क्रेडिट को ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड नागपूर यांनी केली होती.

## मुस्लिमांना दुय्यम दर्जाचे नागरिक बनविण्याचा प्रयत्न : असदुद्दीन ओवेंसी



> ओवेसी म्हणाले, या विधेयकाचा उद्देश हा मुस्लीम नागरिकांना अपमानित करणे असा आहे. मुस्लीमांना दुय्यम दर्जाचे नागरिक बनविण्याचा या विधेयकाचा हेतू दिसतो. तसेच या देशात मंदिर आणि मशिदीच्या मुद्द्यावर तणाव पसरावा, असा भाजपाचा हेतू दिसतो. या विधेयकाच्या माध्यमातून मुस्लीमांच्या स्वातंत्र्यावर घाला घालण्यात येत आहे. तसेच शरियत, मशीद आणि मदरशांना लक्ष्य केले जात आहे,
>
> \- असदुद्दीन ओवेंसी

**नवी दिल्ली :** एनडीएने लोकसभेत सादर केलेल्या वक्फ (सुधारणा) विधेयकाला विरोधकांनी जोरदार विरोध केला. तसेच विरोधकांच्या वतीने तब्बल डझनभर अल्पसंख्याक खासदारांनी लोकसभेत भाषणातून विधेयक मुस्लीम समाजाच्या अधिकारांवर गदा आणणारे असल्याचे सांगितले. तसेच धार्मिक विषयात सरकारी नियंत्रण वाढण्यास निमंत्रण देणारे आहे, असाही आरोप विरोधकांनी केला. लोकसभेत विधेयकावर चर्चा सुरू असताना एमआयएम पक्षाचे प्रमुख असदुद्दीन ओवेसी यांनी आपल्या भाषणानंतर विधेयकाची प्रत फाडली. तसेच हे विधेयक मुस्लिमांना दुय्यम दर्जाचे नागरिक मानत आहे, अशीही टीका ओवेसींनी केली. इतर खासदारांनीही विधेयकातील अनेक तरतुदींवर जोरदार आक्षेप घेतला. विधेयकानुसार, पाच वर्ष इस्लाम धर्माचे अनुकरण करणारेच आता वक्फला आपली मालमत्ता दान करू शकतात. या तरतुदीवर अनेकांनी आक्षेप घेतला. संयुक्त संसदीय समितीच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. तसेच या विधेयकामुळे वक्फ मालमत्तांना घेऊन अनेक ठिकाणी कायदेशीर खटले सुरू होतील, अशीही भीती व्यक्त करण्यात आली.काँग्रेसचे खासदार इम्रान मसूद यांनी हे विधेयक असंवैधानिक असल्याचे म्हटले. मुस्लीम धर्माचे अनुकरण करणारा व्यक्ती, याची कायदेशीर व्याख्या काय आहे? सर्वच मुस्लीम पाच वेळा नमाज अदा करत नाहीत. तसेच सर्वचजण रोजा पाळत नाहीत. तर मुस्लीम धर्माचे आचरण करण्याचे निकष काय असतील? तसेच वक्फ परिषदेच्या 22 सदस्यांपैकी 12 सदस्य बिगरमुस्लीम असणार आहेत.

## लोकसभेत अखिलेश यादव आणि अमित शहा यांच्यात शाब्दिक चकमक



**नवी दिल्ली :** समाजवादी पक्षाचे प्रमुख अखिलेश यादव यांनी भाजपावर नवीन राष्ट्रीय अध्यक्ष पदाच्या नियुक्तीवरून खोचक टीका केली आहे. 'जो पक्ष स्वतःला जगातला सर्वात मोठा पक्ष मानतो, त्यांना आपला राष्ट्रीय अध्यक्ष अद्याप निवडता आलेला नाही', असे वक्तव्य अखिलेश यांनी लोकसभेत केले.

यावर केंद्रीय गृहमंत्री आणि भाजपा नेते अमित शाह यांनीदेखील अखिलेश यांना त्यांच्याच शैलीत उत्तर दिले. यावेळी त्यांनी विरोधी पक्षावर टीका करत त्यांच्यावर कुटुंबाचा अजेंडा पुढे नेल्याचा आरोप केला. भाजपाचे नवीन राष्ट्रीय अध्यक्ष निवडण्याबाबत अद्याप काहीही निर्णय झालेला नाही. यावर अखिलेश यांना उत्तर देताना अमित शाह यांनी म्हटले की, 'इथे जेवढे पक्ष आहेत, त्यांना केवळ पाच जणांना एकत्र येत त्यांच्या त्यांच्या पक्षाचे अध्यक्ष निश्चित करायचे आहेत. मात्र, आमच्या पक्षात 12 ते 13 कोटी सदस्यांमधून एकाची निवड करायची असते, त्यासाठी वेळ तर लागणारच.'

शाह यांनी पुढे मोठ्या मजेशीर पद्धतीने अखिलेश यादव यांना उत्तर दिले. 'तुमच्याबाबतीत फार वेळ लागणार नाही. मला तर वाटतं की तुम्ही पुढची 25 वर्षे पक्षाचे अध्यक्ष असाल.' शाह यांच्या या उत्तरावर अखिलेश यादव हसताना दिसले.

दरम्यान, सत्ताधारी भाजपाच्या अध्यक्षपदाची निवड करण्याची प्रक्रिया गेल्या 10 महिन्यांपासून प्रलंबित आहे. सध्या सुरू असलेल्या संसदेच्या अधिवेशनानंतर ही प्रक्रिया पुन्हा हाती घेतली जाईल, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. एप्रिल महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत भाजपा त्यांच्या नवीन राष्ट्रीय अध्यक्षाची घोषणा करण्याची शक्यता आहे.

भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांचा कार्यकाळ संपुष्टात आला आहे. जानेवारी 2020 मध्ये नड्डा यांची एकमताने भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली होती. भाजपा अध्यक्षांचा कार्यकाळ हा तीन वर्षांचा आहे. असे असतानाही लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नड्डा यांचा कार्यकाळ जून 2024 पर्यंत वाढवण्यात आला होता. अखिलेश यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नागपूर दौऱ्याबाबतही भाष्य केले. 'नुकतीच जी नागपूरची यात्रा पार पडली, ती पुढच्या 75 वर्षांच्या एक्स्टेंशनची यात्रा तर नाही ना', असंही अखिलेश यादव यांनी खोचकपणे म्हटले.

## वक्फ विधेयक मंजुरीआधीच्या नाट्यमय घडामोडी!

**नवी दिल्ली :** वक्फ सुधारणा विधेयक लोकसभेत बुधवारी मध्यरात्री मंजूर झाले. 288 विरुद्ध 232 अशा फरकाने विधेयक मंजूर झाल्यानंतर त्यावर देशभरातून प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. मात्र, मध्यरात्री 12 नंतर विधेयकावर घेतलेल्या मतदान प्रक्रियेदरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह व संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी घेतलेला 'वॉशरूम ब्रेक' चर्चेचा विषय ठरला. या मुद्द्यावरून विरोधी बाकांवरून काँग्रेस सदस्यांनी गोंधळ घातला खरा, पण अवघ्या काही मिनिटांत त्यांना त्यांच्याच दोन खासदारांमुळे माघार घ्यावी लागली! लोकसभेत बुधवारी मध्यरात्रीनंतर जवळपास दोन तास चाललेल्या मतदान प्रक्रियेनंतर वक्फ सुधारणा विधेयक मंजूर करण्यात आले. तब्बल 12 तासांहून जास्त काळ चर्चा केल्यानंतर मध्यरात्री 12 वाजून 6 मिनिटांनी वक्फ सुधारणा विधेयक मंजुरीसाठी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलं. पुढचे जवळपास दोन तास मतदानाची तीन टप्प्यांत प्रक्रिया चालली. त्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह व संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हे मतदानादरम्यान उठून सभागृहाबाहेर गेल्यामुळे मोठा गदारोळ झाला. खुद्द अध्यक्षांनी त्यांची ही कृती रास्त असल्याची भूमिका मांडली.

लोकसभेच्या संसदीय कार्य समितीने वक्फ सुधारणा विधेयकावर चर्चेसाठी 8 तासच ठेवले




होते. पण प्रत्यक्षात ही चर्चा 12 तास चालली. दोन्ही बाजूंनी आक्रमकपणे आपल्या भूमिका मांडण्यात आल्या. शेवटी मध्यरात्री 12 वाजता मतदानासाठी सादर केलेलं विधेयक 2 वाजण्यासाठी 2 मिनिटे शिल्लक असताना पूर्णांशाने मंजूर झाले! पण विधेयकाच्या प्रत्येक कलमावर मतदानावरून दावे-प्रतिदावे चालू असताना विरोधकांनी मात्र वेगळ्याच मुद्द्यावरून सरकारविरोधात आघाडी उघडली.

वक्फ सुधारणा विधेयक लोकसभेत मतदानासाठी मांडल्यानंतर काही वेळाने केंद्रीय गृहमंत्री अमित शाह व संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हे उठून सभागृहाबाहेर जाताना दिसले. तात्काळ विरोधी बाकांवरून काँग्रेस खासदार के.सी. वेणुगोपाल यांनी त्यावर आक्षेप घेतला. मतदानादरम्यान अशा प्रकारे सदस्यांना सभागृहाबाहेर जाण्याची परवानगी दिली जाऊ शकत नाही, असा मुद्दा त्यांनी उपस्थित केला.

## ताजमहालची मालकी कोणाकडे?

### उत्तर प्रदेश सुन्नी वक्फ बोर्ड आणि भारतीय पुरातत्व सर्वेक्षण यांच्यात काय वाद



**लखनऊ :** देशभरात गेल्या काही दिवसांपासून वक्फ दुरूस्ती विधेयकाची जोरदार चर्चा होत आहे. अशात काल लोकसभेत हे विधेयक मंजूर झाले असून, आज राज्यसभेत याच्या मंजुरीसाठी मतदान होणार आहे. दरम्यान यामुळे वक्फशी संबंधित अनेक वास्तू आणि मुद्दे समोर येत आहेत. यामध्ये भारतातील सर्वात प्रसिद्ध वास्तू असलेल्या ताजमहालचाही समावेश आहे. दरम्यान ताजमहालच्या मालकीबाबत गेल्या अनेक वर्षांपासून कायदेशीर आणि राजकीय वाद सुरू आहे. 17 व्या शतकातील हा ताजमहाल उत्तर प्रदेश सुन्नी वक्फ बोर्डाचा आहे की त्याचा ताबा भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या ताब्यात आहे हा वादाचा केंद्रबिंदू आहे. अनेक दशकांपासून सुरू असलेल्या या प्रकरणात न्यायालयीन लढाया, राजकीय वाद आणि धार्मिक दावेही झाले आहेत. पण अद्याप हा प्रश्न सुटलेला नाही.

**1998 मध्ये वादाला सुरूवात**

ताजमहालच्या मालकीबाबतचा वाद सर्वात प्रथम 1998 मध्ये सुरू झाला. त्यावेळी फिरोजाबाद येथील व्यापारी इरफान बेदार यांनी उत्तर प्रदेश सुन्नी वक्फ बोर्डाकडे ताजमहालला वक्फ मालमत्ता म्हणून घोषित करण्यात यावे असा अर्ज केला होता. त्यावेळी त्यांनी ऐतिहासिक ताजमहालची देखभाल करण्याची जबाबदारीही आपल्याकडे सोपवण्याची विनंती केली होती.

**कल्याण डोंबिवली पालिकेच्या प्रभारी आयुक्तपदी हर्षल गायकवाड**

इरफान बेदार यांच्या अर्जानंतर, वक्फ बोर्डाने वर्षानुवर्षे ताजमहालचे व्यवस्थापन करणाऱ्या भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाला नोटीस बजावली. यामुळे ताजमहालच्या मालकीबाबत निर्णय होण्याऐवजी कायदेशीर संघर्ष सुरू झाला.

पुढे 2004 मध्ये इरफान बेदर यांनी ताजमहालची देखभाल करण्याची जबाबदारी मिळावी यासाठी यासाठी अलाहाबाद उच्च न्यायालयात दावा दाखल केला होता. यानंतर न्यायालयाने वक्फ बोर्डाला हे प्रकरण गांभीर्याने घेण्याचे निर्देश दिले. त्यामुळे वक्फ बोर्डाने 2005 मध्ये ताजमहालची वक्फ मालमत्ता म्हणून नोंदणी केली. पण, या निर्णयाला भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले.






## अमेरिका भारताकडून 26 नव्हे 27 टक्के कर आकारणार!

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतासह जगभरातील अनेक देशांवर आयात शुल्क (टॅरिफ) लागू केले आहे. अमेरिकेने सर्व देशांवर सरसकट 10 टक्के आयात शुल्क लागू केले आहे. तर, काही देशांवर Resiprocal Tariff (परस्पर आयात शुल्क) लागू केले आहे. म्हणजेच जे देश आधीपासून अमेरिकेकडून कर वसूल करत आहेत त्या-त्या देशांकडून आता अमिरिकेने देखील तितकेच (किंवा त्या प्रमाणात) आयात शुल्क वसूल करण्यास सुरुवात केली आहे. यात भारताचाही समावेश आहे. अमेरिकेने भारतावर 26 टक्के, चीनवर 34 टक्के, व्हिएतनामवर 46 टक्के आयात शुल्क लागू केल्याचे वृत्त समोर आले होते. दरम्यान, भारतावरील आयात शुल्क हे 26 टक्के नसून 27 टक्के असल्याचे अमेरिकेने स्पष्ट केले आहे. व्हाइट हाऊसने एक अधिकृत आदेश जारी करून याची पुष्टी केली आहे. ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार भारतावर 26 टक्के आयात शुल्क लागू करण्यात आले होते. मात्र, आता ट्रम्प प्रशासनाने एक अधिकृत आदेश जारी केला आहे. त्यामध्ये म्हटले आहे की भारतावर अमेरिकेने 27 टक्के आयात शुल्क लागू केले आहे. भारताबद्दल अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, 'नवी दिल्ली आपल्याकडून खूप आयात शुल्क आकारत आहे.' या शुल्काबाबत ट्रम्प यांनी 'खूप कठोर कर आकारणी' असा उल्लेख केला आहे. ट्रम्प म्हणाले, 'त्यांचे (भारत) प्रधानमंत्री अलीकडेच अमिरेकेला आले होते. ते माझे खूप चांगले मित्र आहेत. मी त्यांना म्हणालो, की तुम्ही माझे चांगले मित्र आहात, परंतु, तुम्ही आमच्याबरोबर योग्य व्यवहार करत नाही. भारत आमच्याकडून 52 टक्के आयात शुल्क आकारतो. त्यामुळे आम्ही त्यांच्याकडून अर्ध आयात शुल्क म्हणजेच 26 टक्के शुल्क घेणार आहोत. हा निर्णय घेणं खूप कठीण होता. एकीकडे ट्रम्प यांनी भारताकडून 26 टक्के आयात शुल्क आकारण्याबाबत वक्तव्य केलं आहे, तर व्हाइट हाऊसने सरकारच्या अधिकृत दस्तऐवजांमध्ये भारताकडून 27 टक्के आयात शुल्क आकारण्याबाबतचा उल्लेख केला आहे. त्यामुळे ट्रम्प यांच्याकडून चुकून 26 टक्के उल्लेख झाला असावा असेही म्हटले जात आहे. मात्र, इतर काही देशांकडून आकारल्या जाणाऱ्या आयात शुल्कातही बदल केल्याचे समोर आले आहे. त्यामुळे व्हाइट हाऊसने आयात शुल्कात बदल केल्याचे स्पष्ट आहे. अमेरिकेने भारताव्यतिरिक्त दक्षिण कोरिया, थायलंड, म्यानमार या देशांवरही आयात शुल्क लागू केले आहे.







“ विनम्रता आणि अहंकार हे एकत्र कधीच राहू शकत नाहीत. ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



## संपादकीय

# सरकारला विकासाचा विसर !

2026 मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीनंतर कर्नाटकातील नागरिकांना हिंदूविरोधी आणि भ्रष्ट सरकारपासून मुक्तता मिळणार असल्याचा दावासुद्धा अमीत शहा यांनी केला आहे. कर्नाटकात भ्रष्टाचारही शिगेला पोहोचला आहे. लोकसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेबाबत विरोधी पक्षांकडून पसरवल्या जाणाऱ्या अफावांवरही त्यांनी टीका केली. लोकसभा मतदारसंघांच्या सीमांकनादरम्यान दक्षिण भारतीय राज्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही, असा दावा गृहमंत्री यांच्याकडून वारंवार केला जात आहे. हे खरे असले तरी दाक्षिणात्य राज्यातील नेत्यांचा त्यावर विश्वास बसत नाही आहे. त्यांच्यामते, दक्षिणेतील जागा कमी होणार नाही हे एकदा सत्य मानले तरी उत्तरेकडील जागा मोठ्या प्रमाणावर वाढतील आणि असे झाले तर उत्तरेपुढे दक्षिणेच्या जागा खूप कमी वाटतील, हेही खरे आहे. यापुढे देशाचे राजकारण केवळ विकासाच्या मुद्द्यावर लढले जाईल, असा दावा केला जात होता. साधारणतः दहा वर्षांपूर्वीचा काळ आठवला की हे विधान सहज आपल्या लक्षात येईल. मात्र, सध्याचे राजकारण विकासापासून लांब गेले की काय? अशी शंका येऊ लागली आहे. संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा दुसरा भाग अंतिम टप्प्यात पोहचला आहे. शुक्रवारचा दिवस बजेट सेशनचा शेवटचा दिवस आहे. या आठवड्यात संसदेचे कामकाज मंगळवार ते शुक्रवार असे चार दिवस आहे. या आठवड्यात संसदेत जोरदार गोंधळ झाला. सध्या देशाला आणि या देशवासीयांना बेरोजगारी, गरिबी, गुन्हेगारी, लैंगिक असमानता, वैद्यकीय आणि मूलभूत सुविधा यासारख्या समस्या भेडसावत असताना त्यावर उपाययोजना करण्याचे जसे प्रयत्न व्हायला पाहिजे तसे होताना दिसत नाही. याउलट इतिहासातील जुने मुद्दे उकरून काढण्यात पुढारी मंडळींना जास्त रस असल्याचे दिसून येत आहे. यात औरंगजेबाच्या कबरीपासून महाराणा सांगा यांच्या नावावरून वाद उकरून काढणे सामील आहे. समाजवादी पक्षाचे खासदार रामजीलाल सुमन यांनी राज्यसभेत बोलताना भाजपचा डीएनए बाबरचा डीएनए असल्याचे विधान केले. एवढेच नव्हे तर, बाबरला भारतात कुणी आणले? असा प्रश्न उपस्थित करीत इब्राहिम लोदीला हरवण्यासाठी राणा सांगा यांनीच बाबरला आणले होते, असे सांगितले. केंद्रीय पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी लगेच त्यावर आक्षेप घेत विरोध नोंदविला. महाराणा सांगा यांनी देशवासीयांच्या मनात स्वातंत्र्याची भावना जागृत केली होती.

भारताला गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी प्रयत्न केले होते आणि भारताची संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न केले होते. विकासाची चर्चा सुरू असताना अशी चर्चा व्हायला नको, असेही शेखावत म्हणाले. परंतु, राजकारण्यांनी आपली मतपेढी मजबूत करण्यासाठी असे वाद निर्माण करण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही देशात ऐतिहासिक मुद्द्यांवरून फूट पाडण्याचे प्रयत्न झाले आहेत. ‘पद्मावत’ या चित्रपटावरूनही बराच वाद निर्माण झाला होता. चित्रपटात ऐतिहासिक तथ्यांना विकृत पद्धतीने सादर करण्यात आले, असा आरोप केला होता. यामुळे मोठा वाद निर्माण झाला होता. कर्नाटकात टिपू सुलतानच्या जयंतीचा उत्सव साजरा होत असतानाही असाच वाद निर्माण झाला होता. एवढेच नव्हे तर यावेळी कलम 144 लागू करण्यात आले होते. निदर्शने करणाऱ्या शेकडो लोकांना ताब्यात घेण्यात आले होते. उत्तर प्रदेशातील संभल जिल्ह्यात मागील काही दिवसांपासून धार्मिक वाद निर्माण झाला आहे. याचा फायदा आपापल्यापरीने घेतला. या संवेदनशील मुद्द्यावरून झालेल्या हिंसाचारात पाच जणांचा मृत्यू झाला. यानंतर, देशाच्या इतर भागातही असेच वाद निर्माण महाराष्ट्रातील औरंगजेबाच्या कबरीवरून वाद निर्माण झाला आहे. या मुद्द्यावरून सत्ताधारी आणि विरोधी पक्षांत जोरदार कलगीतुरा रंगला आहे. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपाच्या फैरी झाडल्या जात आहेत. याच कारणावरून नागपूरमध्ये हिंसाचार झाला. कर्फ्यूमुळे सामान्य नागरिकांना खूप त्रास सहन करावा लागला. देशातील कामगार, गरीब आणि कामगार वर्ग अनेकदा अशा वादांना बळी पडतात, हे तेवढेच खरे आहे. वक्फ विधेयकाला सभागृहाच्या पटलावर ठेवले आहे. मात्र, पाच राज्यांत विधानसभेची निवडणूक होणार असताना सत्ताधारी पक्ष वक्फ विधेयक आणून अल्पसंख्याक मतदारांना नाराज करण्याचा प्रयत्न करणार काय? असा प्रश्न विचारला जात आहे. 2026 च्या मे महिन्याच्या आधी बिहार, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, आसाम आणि पुदुचेरी या पाच राज्यांत विधानसभेची निवडणूक होणे आहे. या राज्यांत विधानसभेची निवडणूक होणे आहे. या सर्व राज्यांमध्ये अल्पसंख्याक मतदारांची संख्या बऱ्यापैकी आहे. अशात, सरकार नेमका कोणता डाव खेळणार याकडे लक्ष लागून आहे. तिकडे, गृहमंत्री अमित शहा यांनी 2025 आणि 2026 या दोन वर्षात होणाऱ्या विधानसभांच्या निवडणुकीची व्यूहरचना तयार केली आहे. बिहारची निवडणूक कशी जिंकायची याचा मास्टर प्लॅन तयार आहे. गृहमंत्री आणि भाजपचे माजी राष्ट्रीय अध्यक्ष अमित शहा पूर्ण निवडणुकीच्या मूडमध्ये बिहारमध्ये गेले होते. शनिवार आणि रविवारी मध्यरात्रीपर्यंत बैठका आणि चर्चा सुरू राहिल्या. 2025 च्या बिहार निवडणुकीपासून ते 2026 च्या कर्नाटक निवडणुकीपर्यंतची योजना स्पष्ट केली. समाजाच्या तळागाळातील लोकांना राजद प्रमुख लालूप्रसाद यादव यांच्या काळात सरकार किती भयानक पद्धतीने चालत होते याची आठवण करून देण्याचा सल्ला पक्षाच्या नेत्यांना देण्यात आला आहे. येत्या विधानसभा फायदशार ठरले केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पक्षाच्या कार्यालयात आयोजित बैठकीला संबोधित करताना हे निर्देश दिले. त्यांनी कर्नाटक निवडणुकीसह 2026 च्या बिहार निवडणुकीसाठी भाजपच्या तयारीबद्दलही चर्चा केली. त्यांनी प्रथम बिहार भाजपच्या पदाधिकाऱ्यांशी दीड तास चर्चा केली आणि नंतर कोअर कमिटीशी स्वतंत्रपणे चर्चा केली. गोपाळगंजहून परतल्यानंतर, बिहार निवडणुकीसाठी भाजपच्या तयारीवर मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या नेत्यांशी चर्चा केली. ■ ■

बहुजन सौरभ

# वादग्रस्त वक्फ संशोधन विधेयक...!




**भारताचे अल्पसंख्याक मंत्री किरण रिजिजू आहेत. त्यांनी लोकसभेत वक्फ बोर्ड संशोधन विधेयक सादर केला. ते तेव्हा अतिशय आक्रमक दिसले. ते स्वतः बौद्ध आहेत. देशात महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन सुरु आहे. बौद्ध त्यांच्या अल्पसंख्याक मंत्रालयातील एक घटक आहे. त्यावर ते मौन आहेत. ते भाजप बंधनात जखडले आहेत. हे बंधन थोडे सैल करण्याची देखील त्यांची मानसिकता नाही. उलट भाजपला जे हवे, त्यावर निष्ठा दाखविण्याच्या स्पर्धेत आघाडीवर दिसतात. परिणामी त्यांच्याकडून बौद्धांना न्याय मिळेल याबाबत अपेक्षा नाहीत. भाजप सरकारकडून मुस्लिमांना दुय्यम वागणूक मिळते. त्याचे अनेक पुरावे आहेत. वक्फ संशोधन विधेयक त्याचाच एक भाग आहे.**

वक्फकडे संचित मालमत्ता दान आणि देणग्यातून आली आहे. मदरशा, मस्जिद, कब्रस्थान, नमाजासाठी गरज तिथे काही जागा सरकारने दिल्या. त्या जागा लिजवर आहेत. त्यापेक्षा अनेक पटीने जागा हिंदू व अन्य धर्मियांना दिल्या आहेत. नागपुरातच शिक्षण संस्था व मंदिरांच्या नावावर अनेक पहाड हडपले गेलेत. वानाडोंगरी हे त्यापैकी एक उदाहरण. हे भाजपच्या काळातही घडले. त्यासाठी काही नेते काँग्रेसमधून भाजपमध्ये गेले. नार्थ अंबाझरी मार्गावर धिरन कन्याशाळा ते बॅ. वानखेडे सभागृहापर्यंतच्या या मोक्याचा जागा कोणी कशा मिळविल्या. त्याच्या सुरस कथा आहेत. त्यांच्या चौकशीसाठी बट्टा आयोग नेमला गेला होता. त्या तुलनेत वक्फच्या जागा मुठभर आहेत. भारत हा 140 कोटीचा देश आहे. त्यात मुस्लिम सुमारे 17 कोटी आहेत. त्यापैकी 30 टक्के गरीबी रेषेच्या खाली जगत आहेत. त्यांच्यावर प्रहार करण्यात भाजप एकही संधी सोडत नाही. भाजप सरकारने मोजक्या आठ-दहा उद्योगपतीचे कर्ज माफ केले. ती रक्कम वक्फ बोर्डाच्या मालमत्तेच्या मुल्याच्या आठपट अधिक आहे. त्यावर सरकार मौन आहे. या उलट वक्फच्या मालमत्तांवरून देशभर हो-हल्ला करीत आहे. 2022 मध्ये तत्कालिन वित्त राज्यमंत्री भागवत कराड यांनी राज्यसभेत सांगितले. 2017 ते 2022 या पाच वर्षात बँकांनी 9.92 लाख कोटी रूपये राईट ऑफ केले. त्यानुसार भाजपच्या दहा वर्षाच्या सत्ता काळात उद्योजकांचे सुमारे 15 लाख कोटी रूपयांचे बँक कर्ज माफ केले. खा. सुप्रिया सुळे यांनी असेच मिळते जुळते आरोप केले आहेत. वक्फच्या मालमत्तेचे नेमके मुल्य काढणे कठिण आहे. अनेकांनी अनेक मुल्य सांगितले. एका आकडेवारीनुसार हे मुल्य 1.5 लाख कोटी आहे. याचा अर्थ उद्योजकांच्या कर्जमाफीची रक्कम वक्फच्या एकूण संपत्तीच्या आठ पट जास्त आहे. उद्योजकांचे माफ केलेले कर्ज बुडाले. त्यांचा फटका बँकांना बसला. या उलट वक्फच्या मालमत्ता कायम आहेत. बोर्डाच्या नियंत्रणात आहेत. तरी त्यावर हायतोबा सुरू आहे. हा प्रकार खटकणारा आहे.

वक्फ बोर्डाच्या मालमत्ताप्रमाणे हिंदू मंदिरांच्या सुद्धा मालमत्ता आहेत. देशात सहा लाखावर हिंदू मंदिरे आहेत. यात लहान मंदिरांचा समावेश नाही. मोठ्या मंदिरांमध्ये पद्मनाथस्वामी मंदिर, तिरूपती देवस्थान, शिर्डी साईबाबा मंदिर, वैष्णोदेवी मंदिर आहे. त्यांच्याकडे बरीच मोठी संपत्ती आहे. यासारख्या प्रमुख मंदिराचीच संपत्ती 5 लाख कोटी रूपयांपेक्षा जास्त आहे. मंदिरांमधील चढावा, देणग्या कोट्यवधींच्या असतात. यातील काही रक्कमा गरीब हिंदूच्या सर्वांगिण विकासावर खर्च व्हावी. यासाठी देखील बोर्ड असावे. त्याबाबत सरकार प्रत्यक्षात ठोस असे काही करीत नाही. ते सरकार वक्फ संपत्तीवर नियंत्रण ठेवण्यास उतावीळ दिसते. भाजप सरकारने कुंभमेळा, गंगा नदी शुद्धीकरण, मंदिरांचा विकासावर बराच खर्च केला. या योजना हिंदुत्व एजेंडाचा भाग आहे. या सरकारच्या काळात दोन कुंभमेळे झाले. त्यावर 11 हजार 700 कोटी रूपये खर्च केले. मंदिर विकासासाठी 7900 कोटी रूपये खर्च केले. गंगा शद्धीकरण नमामि गंगा प्रकल्पासाठी 37000 कोटी रूपयांची तरतूद केली. त्यापैकी 20000 कोटी रूपये खर्च केले. तरी गंगेचे पाणी स्वच्छ करण्यात कमालीचे अपयश आले. याशिवाय अन्य खर्च या प्रमाणे 54 हजार 600 कोटी रूपये खर्च केले. त्यावर कोणाचा आक्षेप नाही. देशाच्या एकूण संपत्तींमध्ये वक्फ बोर्डाच्या संपत्तींचा देखील समावेश आहे. देशाच्या एकूण संपत्तींच्या तुलनेत वक्फच्या संपत्ती 0.01 टक्का सुद्धा नाहीत. तरी हे भाजप सरकारला पचत नाही. हे दुखणे आहे.

या देशाचे संविधान धर्मनिरपेक्षता शिकविते. धर्म, जातीपेक्षा माणूसकी, माणूसपणाला महत्त्व देते. त्या संविधानाच्या लोकशाही चौकटींच्या माध्यमातून हे सरकार सत्तेवर आले. नरेंद्र मोदी हे आरएसएसच्या मुशीत घडले. संघ व सत्ताधारी भाजप सातत्याने मुस्लिम द्वेषाचे राजकारण करत आले. हा द्वेष अलिकडे टोकाला पोहचला. या द्वेषातून सत्ता वाढीचे समिकरण बनले. त्यानुसार बहुसंख्याक समाजाची मानसिकता घडविण्याचा प्रयत्न सुरू आहे. हिंदू-मुस्लिम राजकारण हा आधार केला आहे. त्यासाठी इतिहासात दफन झालेली तीनशे वर्ष जुनी प्रकरणे चव्हाट्यावर आणली जात आहेत. तेव्हा त्यासाठी संघाशी संलग्न असलेल्या विश्व हिंदू परिषद, बजरंग दलसारख्या संघटनांचा वापर केला जाते.



भूपेंद्र गणवीर
9850031019

नागपूरची दंगल त्याचाच भाग होय. नागपुरात सर्व जाती, धर्मांचे लोक गुण्यागोविंदाने राहत आले. हिंदू-मुस्लिम मैत्रीचे अनेक दाखले आहेत. संकटाच्या काळात रक्त देण्यापासूनच्या घटना आहेत. त्या नागपूरी सद्भावनेला गालबोट लावण्याचे कृत्य झाले. त्याचा सच्चा नागपूरी निषेध करील. त्यामध्ये रॉकेल ओतण्याचे काम महायुती सरकारने केले. दंगेखोरीच्या नावावर बुलडोझरने घरे पाडली. त्यात अजित पवार आणि एकनाथ शिंदे तेवढेच दोषी आहेत. सत्तेची चटक माणसे बिघडविते. तत्वांना तिलाजंली द्यावी लागते. त्यांना खुंटीला टांगून ठेवावे लागते. हे अख्या महाराष्ट्राने उघड्या डोळ्यांनी बघितले. तत्वांसाठी सत्तेला, प्रभोलनांना ठोकर मारणारे लहान-मोठे शेकडो उदाहरणे आहेत. त्याचा पाढा वाचण्याची गरज नाही. मोगल व इंग्रजांना फितूर झालेलेही अनेक आहेत. सत्ताधाऱ्यांना त्या गद्दारांच्या इतिहासाचा सोयीस्कर विसर पडतो. त्याकडे कानाडोळा केला जातो. सत्ता व राजकारणात प्रचंड भेसळ वाढली. त्यात तत्ववादी शोधून सापडणे कठिण झाले आहे. सबके कपडे गंदे अशी म्हणण्याची वेळ आली. वक्फ बोर्डात भ्रष्टाचार असेल. तर त्याला आळा घालण्याची तरतूद आहे. या संपत्तीचा लोकपयोगी कामांसाठी उपयोग व्हावा. मात्र सरकारच्या हेतूवर मुस्लिमांचा संशय आहे. त्यातून वक्फ संशोधन बिलाला विरोधी पक्षांचा विरोध आहे. लोकसभेत यावर वेगवेगळी मते व्यक्त झाली. गृहमंत्री अमित शहा यांनी हे संशोधन विधेयक सामान्य मुस्लिमांच्या हितासाठी असल्याचे सांगितले. तसेच या विधेयकात न्यायालयात आव्हान देण्याची तरतूद असेल. अमित शहा यांनी काँग्रेसच्या काळात 2013 मध्ये संमत कायद्यांवर जोरदार प्रहार केला. त्या तुष्टीकरणाच्या विरोधात हे संशोधन विधेयक आणावे लागले असे ठासून सांगितले. लोकसभेत मध्यरात्रीनंतर 288 विरूद्ध 232 मतांनी विधेयक संमत झाले. काँग्रेसचे गौरव गोगंई यांनी विधेयकाला जोरदार विरोध केला. संविधान कमजोर करणारा. संभ्रम पसरविणारा, नेहमी भांडणे राहतील. या दृष्ट हेतून आणलेला विधेयक असा आरोप केला. एआयएमआयचे असूदुद्दीन ओवेशी यांनी हे विधेयक संविधान विरोधी आहे. अनुच्छेद 14 चे उल्लंघन आहे. धार्मिक संस्थेत हस्तक्षेपाचा आरोप केला. इंडिया आघाडीतील सर्वच पक्षांनी विधेयकाला विरोध केला. आता राज्यसभेत विधेयक मांडला जाणार आहे. त्याकडे देशाचे लक्ष आहे. ■ ■

# जम्बुद्वीपाचा जाणता सम्राट देवानांप्रिय प्रियदर्शी अशोक

**जगात अनेक सम्राट होऊन गेले. त्या सर्वांमध्ये जम्बुद्वीपाचा अर्थात बृहदभारताचा महान चक्रवर्ती सम्राट अशोक इतिहासकारात कमालीचा लोकप्रिय दिसून येतो. देशी-विदेशी इतिहासकारांनी या सम्राटावर अगदी भरभरून लेखन केलेले आढळते. मला वाटत नाही इतके विपूल लेखन जगातील कुण्या अन्य सम्राटावर झाले असू शकेल. काही नामवंत इतिहासकारांनी अगदी मोजक्याच परंतू समर्पक शब्दात त्याचे मुल्यमापन करण्याचा प्रयत्न केला आहे, त्या मुल्यमापनाचे काही उद्धरणे या ठिकाणी नमूद केले पाहीजे.**

प्रसिद्ध ब्रिटीश इतिहासकार व कादंबरीकार, हर्बर्ट जॉर्ज वेल्स लिहितात, ‘ज्याची दखल इतिहासाने घेतली अशा हजारो शासकामध्ये सम्राट अशोकाचे स्थान चमकत्या ताऱ्याप्रमाणे अद्वितीय आहे.’ प्रसिद्ध फ्रेन्च प्राच्यविद्या विद्वान, पॉलमेन ऑरसेल लिहितात मौर्य काळातील तृतीय सम्राट अशोक केवळ भारतीय राजे-महाराजे यांच्यातच सर्वोच्च ठरतो असे नाही, तर तो जागतीक इतिहासातील महान दार्शनिकामध्येसुद्धा एक होता.’ प्रसिद्ध भारतीय इतिहासकार, राधाकमल मुखर्जी लिहितात, संपूर्ण इतिहासात असा कोणताही राजा नाही, ज्याचे जिवन-मानव अशोक आणि राजा अशोक यांच्या तुलनेत उभे करता येऊ शकेल.’

नमुद उद्धरणे वाचून जम्बुद्वीपाचा हा सम्राट किती उच्च कोटीचा होता याची प्रकर्षाने जाणीव होते. परंपरागत चालत आलेल्या आणि ज्यामध्ये केवळ सैन्यशक्तीचा गर्व भरलेला आहे अशा उपाधी विशेषनाचा अशोकाने अव्हेर करून ‘देवानांप्रिय प्रियदर्शी अशोक’ हि विलक्षण व नावीन्यपूर्ण उपाधी धारण केली. ही उपाधी धारण करणारा जम्बुद्विपाचा तो एकमेव पहिला व अंतीम सम्राट होय. या उपाधीत त्याच्याकडे असलेली अजयमित्रता, आपल्या प्रजेप्रती पितृप्रेम, दया, क्षमा व करुणेचे भाव इत्यादी गुणधर्म ओतप्रोत भरल्यासारखे वाटतात. सम्राट अशोकाने त्याच्या साम्राज्यात ज्या विशिष्ट ठिकाणाची निवड करून त्या ठिकाणी जे शिलालेख स्थापन केले, त्या शिलालेखातून वर्तमान संविधानाचे संकेत जाणवतात. अंदाजे सव्वादोन हजार वर्षापूर्वी शिलालेखाद्वारे त्याने लोकांच्या कल्याणार्थ ज्या आज्ञा जारी केल्या त्या वाचून थक्क झाल्यासारखे होते आणि म्हणूनच म्हणावेसे वाटते की, काळाच्या दोन नव्हे तर अनेक पावलांनी पुढे चालणारा हा सम्राट खऱ्या अर्थाने जगातला पहिला ‘जाणता सम्राट’ होता. संपूर्ण जम्बुद्वीपात किंवा बृहदभारतवर्षात सम्राट अशोकाने अनेक शिलालेख स्थापन केले असतील. त्यामधून लोक कल्याणार्थ आज्ञा जारी केल्या असतील. परंतू आज आम्हाला त्यापैकी फक्त 35 शिलालेख प्राप्त झाले आहे. अन्य शासकाप्रमाणे कुठेही




स्वतःची आत्मप्रौढी किंवा सैनिकी पराक्रमाचे दिग्वीजयी वृत्तांत त्या शिलालेखातून आढळून येत नाही. आढळून येते फक्त लोककल्याणा करीता व भुतदयेविषयी जारी केलेल्या आज्ञा. चुका करणाऱ्यांसाठी कठोर निर्देश आणि अंतीमतः तथागत बुद्धाच्या धम्माला शरण गेल्यावर त्यासाठी केलेल्या कार्याचा वृत्तांत आणि सम्राटाकडून झालेल्या चुकांची कबुलीसुद्धा. अशोकाच्या प्रत्येक शिलालेखातील मजकुरांचे मुल्य आजही आदर्शवत असल्याचे जाणवते.

न्याय व्यवस्थे संदर्भात सम्राट अशोकाने घेतलेला अजून एक धाडसी निर्णय दिसून येतो. अशोकाच्या शासन आरंभापर्यंत तरी गुन्ह्याच्या अनुशंगाने होणारी शिक्षा ही वर्णाधारीत होती. सम्राट अशोकाने ही पद्धत मोडीत काढली व शिक्षेचे स्वरूप गुन्ह्याच्या आधारावर निश्चित केले. म्हणतात ना Equality before Law ते हेच. सव्वादोन हजार वर्षापूर्वी समतेचे तत्व जोपासणारा व ते प्रत्यक्ष अमलात आणणाऱ्या सम्राटाला मनुष्यातील भेदभाव मान्य नसल्याचे स्पष्ट होते. सम्राटाच्या हयातीपर्यंत दीर्घकाळ त्याच्या साम्राज्यावर परकीय आक्रमणे किंवा अंतर्गत कलह झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे अशोकाच्या राजमुकूटात ‘सार्वभौम चक्रवर्ती सम्राट’ हे विरूद विराजमान होण्यास तो पात्र होता असे अभिमानाने म्हणता येते.

दीर्घकाळ ब्राह्मी लिपी दुर्लक्षित राहिल्याने तिचे वाचनही लोक विसरून गेले, आणि हळूवारपणे हा सम्राट इतिहासाच्या पटलावरून अदृष्य झाला. जेम्स प्रिन्सेप या ब्रिटीश विद्वानाने अथक संशोधन करून सन 1837 या वर्षी ब्राह्मी लिपीची उकल करून तिचे यशस्वी वाचन केले नसते तर जम्बुद्वीपाच्या या चक्रवर्ती सम्राटाचा अध्याय कधीच उघडला नसता. परंतू जेम्स प्रिन्सेपने ब्राह्मीचे वाचन केले आणि त्या नंतर पाषाण प्रस्तर, पाषाणस्तंभ इत्यादीवर उत्कीर्ण असलेल्या अक्षर-साम्य लेखांचे वाचन झाले. त्या वाचनातून उभा राहिला सम्राट अशोकाचा दैदीप्यमान इतिहास. जेम्स प्रिन्सेपचे आम्ही ऋणी आहोत. ब्राह्मी लिपीच्या वाचनातून सम्राट अशोक जरी जगाला कळला होता तरी मात्र तो त्याच्याच सार्वभौम देशात अनभिज्ञच होता. त्याचे अस्तीत्व केवळ पुस्तकातच बंदीस्त झाल्यासारखे होते. जन सामान्यापासून, मान-सन्मानापासून तो दुरच होता. सन 1891 या वर्षी भारतभुमीवर विश्वरत्न डॉ. भिमराव आंबेडकर उर्फ बाबासाहेब आंबेडकर यांचा जन्म झाला. ही घटना जेवढी भारतीय वंचिताच्या दृष्टीने मंगल होती. तेवढीच ती सम्राट अशोकाच्या यथोचीत सन्मानाकरीता सुद्धा महत्वाची ठरली. सन 1947 ला भारताला स्वातंत्र्य मिळाले. देशाचा गाडा कसा चालवला जावा या करिता संविधान निर्मितीचे कार्य अनेक विषयाचे प्रकांडपंडीत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या खांद्यावर सोपविण्यात आले. सार्वभौम भारताचे ध्वजचिन्ह काय असावे, राजमुद्रा कोणती असावी या बाबत जेव्हा संविधान सभेत विषय समोर आला, त्यावेळी सम्राट अशोकाने सारनाथ येथे स्थापन केलेल्या स्तंभावरील सिंहाची व चक्राची शिल्पाकृती निवड डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली. या दोनच प्रतिकांची निवड का केली असावा या बाबत आपल्या पांडीत्यपूर्ण भाषणातून त्यांनी हे संविधान सभेला निश्चितच पटवून दिले असणार. 26 जानेवारी 1950 रोजी संविधानाच्या माध्यमातून घोषीत झालेल्या सार्वभौम भारताच्या ध्वजावर अशोकचक्र विराजमान झाले. सिंहाची प्रतीमा भारत गणराज्याची राजमुद्रा स्थापीत झाली आणि जम्बुद्वीप अर्थात भारतवर्ष पूनः अशोकमय झाला. हे महान कार्य करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे आम्ही ऋणी आहोत. सार्वभौम भारताच्या ध्वजावरील अशोकचक्र पाहून भारताच्या प्रत्येक राजपत्रावरील आणि भारताच्या चलार्थपत्रावरील सिंहमूद्रा पाहुन निश्चितच गौरान्वीत झाल्याचा आनंद होतो. आज अशोक जयंती, देवानांप्रिय प्रिदर्शी अशोकाला त्रिवार नमन! ■ ■

डॉ. मधुकर कठाणे
मो.7219101494

# नवशिक्षितांकडून अपेक्षा

**आमच्या जुमळे परिवारात नुकतीच एक मुलगी एमबीबीएसची फायनल परीक्षा पास झाली. आमचा We Jumle नावाचा व्हाट्सअप ग्रूप आहे. त्यात आम्ही तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला. तोच धागा पकडून मी हा लेख पूढे ओढत नेत आहे.**

आम्ही जुमळे परिवारात माहीत असलेल्या तीन पूर्वजांचा समावेश केलाय. या परिवारात सध्यातरी पन्नासच्या वर कुटुंबे असतील. सर्वांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे असे म्हणता येत नाही. ज्यांनी शिक्षण घेऊन नोकऱ्या मिळविल्यात असे कुटुंब पूढे गेलेत. ज्यांना जमले नाही ते मात्र मागे राहिलेत. करोना महामारीच्या काळात अशा कुटुंबाची दयनीय अवस्था लक्षात आली. या काळात रोज मजुरी करणाऱ्या कुटुंबाचे मोठे हाल झालेत. त्यांचा रोजगार बुडाला होता. त्यामुळे त्यांना जीवन जगणे कठीण झाले होते.

म्हणून सुस्थितीत जगत असलेल्या कुटुंबांनी मदतीचा हात पुढे केला. ‘कोरोना मदत निधी’ जमा करून जवळपास 19 कुटुंबांना 70 हजार रुपये वाटले होते. म्हणून त्यावेळी मला कौशल्यवर आधारित स्वयंरोजगाराची कल्पना सुचली होती. त्या संदर्भात माहिती संकलित करून ती गृपवर टाकली होती.

तसे म्हटले तर डॉक्टर, इंजिनिअर, वकील हे कोर्सेस व्यावसायिक आहेत. पूढेमागे त्यांना रोजगार उपलब्ध होतो. तथापि जे आर्ट्स, कॉमर्स सारखे अव्यावसायिक कोर्सेस आहेत, त्यांना मात्र रोजगाराची तेवढी शाश्वती नसते. मी महाविद्यालयात प्रवेश घेताना कॉमर्स हा विषय घेतला होता. त्यावेळी आमच्यासारख्या गरीब घरातील मुलांना कमी दर्जाचे कोर्सेस घेणे हाच एक पर्याय उरला होता. कारण सायन्स विषय घेतला की, हमखास नापास होते. नापास झाले की, स्कॉलरशीप बंद होते. म्हणजेच शिक्षण बंद होते. असेच आम्हाला सांगण्यात येत होते. इंजिनिअर, डॉक्टर, वकील कसे व्हायचे याची माहितीच नव्हती आणि कुणी सांगितलेही असते तर ते आमच्या आवाक्याबाहेरचे होते म्हणा!

असो. मी मूळ मुद्यावरती येतो. आजच्या घडीला आमच्या परिवारात आठ डॉक्टरांची रांग लागली आहे. त्यात चार महिला आहेत. पूर्वीच्या काळी समाजात डॉक्टर्स असलेच तर सहसा पुरुष वर्गातील राहत, महिला वर्गातील क्वचितच डॉक्टर्स दिसत. पण आता तसे राहिले नाही. स्त्री पुरुष समानतेची ही नांदी आहे.




एक काळ असा होता की, आमच्याच परिवारात काय इतर अनेक परिवारात शिक्षणाचा गंध नव्हता. आमच्या घराण्याचा विचार करतो म्हटले तर त्यावेळी आमच्या घराण्यात कधीतरी डॉक्टर पैदा होतील असे स्वप्नात सुद्धा वाटले नव्हते. मी खेड्यात राहून गरिबीच्या परिस्थितीत शिक्षण घेतले हवादवात, पाण्यापावसात, उन्हातानात, नदी ओलांडत अनवाणी पायांनी रस्ता तुडवत एक कोस दूरवर शाळेत जात होतो. शहरात जाऊन स्कॉलरशीपच्या आधारावर महाविद्यालयीन शिक्षण घेतले. राखीव जागेच्या सवलतीमुळे नोकरी लागली. अशीच परिस्थिती समाजातील कित्येक लोकांची होती. तो काळ म्हणजे अत्यंत दयनीय आणि अंधःकारमय होता. पण नोकरी लागल्यामुळे परिस्थितीत आमुलाग्र बदल झाला. मी माझ्या लहान भावाला डॉक्टर बनवण्याचे स्वप्न साकार करू शकलो आणि तिथूनच शैक्षणिक परंपरा आमच्या घराण्यात सुरू झाली. हे सारे शक्य झाले ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुण्याईनेच.

मला स्कॉलरशिप मिळाली म्हणून मी शिकू शकलो. मला नोकरी मिळाली ती राखीव जाग्यामुळे. या दोन्हीही सवलती जर नसत्या तर मी शिकू शकलो नसतो. कुठेतरी रोजमजुरी करीत जीवन कंठीत राहीलो असतो. राखीव जागा नसती तर मला कोणी दारातही उभ केले नसते. माझ्या एकट्याच्या नोकरीवर पाचसहा जणांचे जीवन अवलंबून होते. अशीच परिस्थिती बहुतेकांची होती.

सांगायचे म्हणजे या दोन्ही सवलती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मिळवून दिल्या होत्या. ऐवढेच नव्हे तर डॉ. बाबासाहेबांनी विज्ञानावर आधारित बौद्ध धम्म आम्हाला बहाल केला. त्यामुळे देवाधर्मावर, यात्रा-जत्रेवर होणारा अनाठायी खर्च वाचला. हा खर्च शिक्षणासाठी लावण्यात आला. देवाधर्माच्या अंधश्रद्धेतून बाहेर पडलो. डॉ. बाबासाहेबांनी शिक्षा आणि दीक्षा ही महत्त्वाची दोन आयुधे समाजाच्या हातात दिल्याने समाजाची उत्तरोत्तर प्रगती होत गेली. ही गोष्ट कोणीही नाकारू शकत नाही. मी नोकरीत आल्यानंतर मला सामाजिक दायित्वाची जाणीव निर्माण झाली; तेव्हापासून बुद्धी, पैसा व वेळ मनोभावे ओतून सामाजिक कार्यात समर्पित झालो.

भगवान बुद्धांची शिकवण



आर. के. जुमळे
93264 50506

मी मा. कांशीरामजींच्या बहुजन चळवळीत काम करत होतो. त्यांनी डॉ. बाबासाहेबांची ‘शासनकर्ती जमात’ बनण्याची संकल्पना मांडली होती. त्यात नोकरदार वर्गांचा मोठा सहभाग घेतला. शासन सत्तेची चावी हस्तगत करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. ऋषीमुनींचा उत्तरप्रदेश सारखा मोठा प्रदेश पहिल्यांदा काबीज केला. निरनिराळ्या राज्यात आमदार खासदार निवडून आणले. देशात ‘होऊ शकते’ची लहर तयार झाली. केंद्राची सत्ता हस्तगत करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. पण त्यांच्या निधनानंतर या बहुजन चळवळीची वाताहत झाली. ही गोष्ट वेगळी.

मला प्रामुख्याने सांगायचे म्हणजे आज उच्च शिक्षण घेऊन नोकरी धंद्यात अग्रेसर झालेल्या वर्गांनी समाजाची नाळ तोडू नये. तर ती घट्टपणे जुळवून ठेवली पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना कारकुनांपेक्षा म्हणजे मोक्याची जागा हस्तगत करणारे अधिकारी वर्ग अधिक पाहिजे होता. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ब्रिटीश कालीन भारताचे गवर्नर जनरल लॉर्ड लिनलिथगो यांना उच्च शिक्षणाकरीता स्कॉलरशिपची मागणी करताना म्हणाले होते की, ‘मला राजवाड्याच्या टोकावर बसणारी माणसे हवीत. कारण तेथून सर्वत्र टेहळणी करता येते. आपल्या लोकांचे संरक्षण करायचे असेल तर अशी पारध करणारी माणसे निर्माण झाली पाहिजेत. कारकून काय करणार?’

महात्मा कबीर आपल्या दोह्यात म्हणतात की,
‘बडा हुवा तो क्या हुवा, जैसे पेड खजूर!
पंछी को भी छाया नही, फल लागे अती दूर!!’

म्हणून या नवशिक्षित वर्गांनी खजुराच्या झाडासारखे उंचच उंच वाढत जावू नये. आपल्या मागे आपला मोठा समाज आपल्याकडे मोठ्या आशेने पाहत आहे. याची जाणीव ठेवली पाहिजे. तरच त्यांच्या शिक्षणाची काहीतरी चीज होईल असे मला वाटते. ■ ■



स्त्री स्वातंत्र मुक्तसंवाद
संयोजक
प्रा. माधुरी गायधनी दुपटे
मो. 9130088095

# आजची स्त्री सुरक्षित आहे का ?




आज सगळ्याच क्षेत्रात स्त्रीचे कर्तृत्व आहे. मात्र आजच्या युगात तीच स्वतःच अस्तित्व कुठेही सापडत नाही. एक स्त्री प्रत्येक ढंगाने आपले अस्तित्व टिकविण्याचा प्रयत्न करत असते. कधी आपला स्वाभिमान जपते, तर कधी आत्मसन्मान आज ती सगळ्याच बाबतीत खंबीर असूनसुद्धा तिच्या असुरक्षिततेच प्रश्नचिन्ह डोळ्यासमोर उभे राहत. खरेच..! खरेच आजची स्त्री सुरक्षित आहे का? हा प्रश्न एकविसाव्या शतकात सुद्धा संपला नाही. मात्र का? तिने केलेल्या आपल्या मुलांवर चांगल्या संस्कारामुळे, की बिघडत चाललेल्या तरुणाईमुळे? आपल्या समाजात एक विकृत समाज घडतोय, की आजची पिढी सोशल मीडियामध्ये इतकी व्यस्त झाली आहे. आपले संस्कार विसरत आहेत. आज असेच काहीस चित्र स्पष्टपणे दिसतेय. अंगावर काटा येतो, जेव्हा विचित्र अशा घटना वाचायला मिळतात, पाहायला मिळतात, या स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री संकल्पनाच बदलून गेली आहे. स्त्री स्वातंत्र्य हे पुरुषप्रधान संस्कृतीच्या जोखडातून कुठेतरी अडकले आहे. तिची अस्मिता कुठेतरी चिरडली जाते याचा विचार आज आपण केलाच पाहिजे. सौंदर्य हे चिरकाल नसते तर ते बघणाऱ्या दृष्टीत असत. हा सिद्धांत जागोजागी मांडला पाहिजे. समाजात स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे. चौकटीच्या बाहेर स्त्री आजही असुरक्षित आहे. अशी कितीतरी घटना घडल्या आहेत. ज्या स्त्रियांना हतबल करत आहेत. त्यांचे मनोबल कमी करत आहेत. घरच्या जबाबदारीमुळे समाजाच्या कोंदणामुळे स्वावलंबनाची आस बाळगत तरीही ती आजही पुन्हा पुन्हा चार भिंतीच्या बाहेर पडत आहे. मात्र आजही घाबरत आहे. या समाजातील असुरक्षिततेला आपणच कुठेतरी चुकतो का? स्त्रियांना स्वातंत्र्य द्यायला..? आज आपण प्रत्येक स्त्रीला स्वतंत्रपणे मुक्तपणे संचार करण्याची सूट दिली. मात्र, ती मुक्तता पूर्णपणे बहाल केली का? हा खूप मोठा प्रश्न निर्माण होतो. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रिया आहेत. मात्र, ते क्षेत्र स्त्रियांसाठी आहे का? याच उत्तर मात्र सापडत नाही. छ. शिवरायांच्या काळामध्ये स्त्रियांचे अस्तित्व टिकवणे हा समाजाचा वसा होता. समाजात एक भलतीच पिढी जन्माला आली आहे. अध्यात्माचा वारसा घेणारी पिढी आज पूर्णपणे दिशाहीन बनली आहे. गरज आहे या समाजातील ही भिन्नता नष्ट करून स्त्रियांना आधार देण्यासाठी. प्रत्येक क्षेत्र त्यांच्यासाठी सुरक्षित बनवण्यासाठी स्त्रीचे आस्तित्व टिकवण्यासाठी स्त्रियांसाठी आज कुठलेही क्षेत्र सुरक्षित नाही. मात्र स्त्रियांना सुरक्षा देणे हे देखील महत्वाचे आहे. स्त्रियांना त्यांच्या आत्मसन्मान देणे हे छ.शिवरायांनी रुजवलेले संस्कार व स्त्रियाप्रती सुरक्षिततेची भावना बाळगा. हीच तर खरी स्त्री सुरक्षा. ■ ■

गायत्री दि. पाटील
मो.9226193208

“ समाजातील समस्यांवर चांगले नजर ठेवणे आणि त्यांच्या सुधारणांसाठी कार्य करणे आपल्या कर्तव्य आहे. ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# भदन्ताचार्य नक्काविट सुगतवंस महाराष्ट्र संघनायक

**सुगत तथागत महाविहाराचे उद्गाते आणि संचालक, संत चोखामेळा वसतीगृह, जळगाव पूज्य भदन्ताचार्य नक्काविट सुगतवंस 'महाराष्ट्र संघनायक' यांच्या आज शुक्रवार 4 एप्रिल 75 व्या जयंतीदिनानिमित्त...**

देवानाम प्रियदर्शी सम्राट अशोकाने आपला पुत्र महामहेंद्र व मुलगी संघमित्रा यांना बुद्ध धम्माचा संदेश घेऊन श्रीलंकेला पाठविले. त्यासमवेत बुद्धगयेतील बोधिवृक्षाची दक्षिण शाखा श्रीलंकेच्या राजा तिस्स यांना भेट म्हणून दिली. ते भारताचे थोडेफार ऋण कां असेना फेडण्याच्या अंतःकरणातील भावनेने धम्मगुरू पूज्य भदन्त बद्देगम विमलवंस अनुनायक थेरा यांनी भारतात बौद्ध धर्माच्या प्रचार-प्रसारासाठी श्रीलंकेत धम्मदूत संकल्प केला आणि ती निरंतर परंपरा श्रीलंकेत आजतागायत सुरू आहे. त्यानुरूप श्रीलंकेच्या कॅगल्ल जिल्ह्यातील नक्काविट नावाच्या गावी आई कंकाणमलागेदर्गीरी मॅनिके आणि वडिल वितान पतिरन्ना हलागे ज्युलियस परेरा यांचे तृतिय सुपुत्र म्हणून कुलरत्न या बालकाचा 4 एप्रिल 1950 ला जन्म झाला. केवळ 13 व्या वर्षी आठव्या वर्गात शिक्षण घेत असताना धम्मगुरू पंडित पूज्य भदन्त बद्देगम विमलवंस अनुनायक थेरा यांनी बौद्ध धम्माच्या प्रचार-प्रसारात श्रीलंकेतील धम्मदूत पाठविण्याचा संकल्प केला. त्याप्रसंगी मनाशी कुलरत्नाला श्रामणेर होण्याची अतिव उत्कंठा, आग्रह आणि अट्टाहास करीत ओढ त्याची परिणीती श्रीलंकेच्या राजधानी कोलंबो, मरदान येथील महापिरीवेण प्रसिद्ध विहारात 30 श्रामणेरांचे दीक्षा समारंभाचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये उल्हास नगर, ठाणे येथील डॉ. भदन्त नलुवेल आंनद महाथेरा यांचाही समावेश होता. आपल्या कुलवंशाचे नाव उज्वल करीन असा आशावाद आई-वडिल आणि परिजनांना वाटले. ते सहजच स्वाभाविक आहे. बालपणीच आजी वाय. डब्ल्यु. पुंची मॅनिके आणि आजोबा एल. के. पुंची अप्पुहामी यांच्यामुळे बुद्ध विहारात नित्यनेमाने जात असल्यामुळे बालमनावर अनामिक ओढ निर्माण झाली. शालेय अभ्यासा-खेरीज धम्माच्या पवित्रतेत अत्यंतिक अभिरूची वाढत गेली. वडील पोस्ट खात्यात कर्मचारी असल्याकारणाने वक्तशीरपणा, शिस्तप्रियता, नियोजन आणि अफाट जनसंपर्क होता. भदन्त बद्देगम विमलवंस यांचा स्वागत सोहळा घरी पार पडला. पुढे धम्माच्या नियमाप्रमाणे कुलरत्नाच्या हातावर पाणी टाकून त्याला आई-वडिलांद्वारा भिक्षू संघात अर्पण करण्यात आले. तसा हा भावूक व किंबहूना स्तब्ध करून टाकणारा. वडिलांचे मार्गदर्शन कानी पडले. 'बाळा, तुझ्या इच्छेनुरूप तुच तुझा शिरोधार्य घेतलेला निर्णय समजून घे, माझ्या कुलरत्ना! काही झाले तरी आपल्या कुलगोत्राचे नाव तुझ्याद्वारे कलंकित होणार नाही याची सर्वतोपरी अर्थात चिवर त्यागापर्यंतची परिस्थिती निर्माण होणार नाही अशी दक्षता ध्यानात घे. हेच अखेर तुला आवर्जून सांगावयाचे आहे!'

बुद्ध वचनाच्या शब्दात सांगावयाचे असेल तर, 'पुब्बे चं कत्तपुञ्ञता... याला अनुलक्षण आहे. केवळ वयाच्या 13 व्या वर्षी 9 जून 1963 मध्ये सकाळी श्रीलंकेच्या राजधानी महापिरीवेण मरदान येथे केसवप्पण (मुंडन) करून त्यांचे नाव गावावरून 'श्रमण नक्काविट सुगतवंस' नामानिदान करण्यात आले. यो हवे दहरो भिक्खु युजन्ति बुद्ध सासने सोमंलोके पभासेति अब्भा मुत्तोव चंन्दिमा.' जो तारूण्यात बुद्ध शासनामध्ये रममाण होत असेल, तो आकाशातील मेघमुक्त चंद्राप्रमाणे प्रकाशित करीत असतो.

भन्ते एन. सुगतवंस यांचे 24 फेब्रुवारी 1967 ला मलेसामि तमिळ शिक्षकांसमवेत भारतात आगमन होते. ते शिक्षण श्रमणांना तमिळ भाषा शिकवीत असत. सर्वप्रथम भन्ते दक्षिण भारतातील तामिळनाडू या प्रांतातील कर्नाटक राज्यात कोलार गोल्डफिल्ड येथे येवून काही दिवसांनी हुबळी शहराच्या विहारात पदार्पण झाले. तेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 14 ऑक्टोबर 1956 च्या नागपूरच्या ऐतिहासिक धम्मदीक्षा सोहळ्यात उपस्थित 7 भिक्षुतील 1 पूज्य भदन्त एम परमशांती यांचा अंतर्भाव होतो. पूज्य भदन्त एम परमशांती यांनी 'दक्षिण भारत बौद्ध महासभा' या नावाची संस्था स्थापन करून कार्यरत केली. भन्ते परमशांती मलेसामि तमिळ भाषेच्या शिक्षकांचे पूर्वाश्रमीचे मामा होते. हुबळीतील उपासक पारंपारिक वर्षानंतर भदन्त बी. विमलवंस पंडित विहार बघण्यासाठी आले होते. आपल्या शिष्य धम्मदूताचे कार्य अवलोकन करण्यासाठी भन्तेनी श्रीलंकेतील मूर्ती शिल्पकाराला पाठविले होते. त्यांना तमिळ भाषा येत नव्हती म्हणून भदन्त एम. सुगतवंस हे मद्रासला त्यांना आणण्यासाठी गेले. ते हुबळी येथील विहारात आले. केवळ 21 दिवसात बुद्ध प्रतिमेचे कार्य पूर्णत्वास आले. हे सारे कामकाज बघून हुबळी येथील बौद्ध अनुयांयास उत्साह वआनंदाचे वातावरण निर्माण झाले. उद्घाटन समारंभ 14 वे दलाई लामा यांच्या हस्ते राजदूत श्री. परेरा (श्रीलंका), अॅड. पी. इलेपेरूम, भदन्त येनानन्द, भदन्त सरणंकण आदि अतिथी म्हणून उपस्थित होते. 1 जुलै 2017 ला कार्यक्रम संपन्न झाला. मोठ्या भन्तेच्या आदेशानी भिक्षू दीक्षा घेण्यासाठी 1981 ला भदन्त एन. सुगतवंस यांना श्रीलंकेला अनुराधापूर येथे उपसंपदा घेण्यासाठी जावे लागले. पूज्य भदन्त मातले सासनंतिलक अनुनायक यांच्या हस्ते संघाच्या उपस्थितीत भिक्षू दीक्षा ग्रहण करून भारतात जळगावला परत आले.



कारण संत चोखामेळा वसतीगृहाची संपूर्ण जबाबदारी आणि भूमिका भदन्त सुगतवंस यांच्यावर येऊन ठेपली होती. जळगाव हे जिल्ह्याचे ठिकाण. या शहराला शोभेल असा मोठा महाविहाराची उभारणी करायची होती. त्या दिशेने वाटचाल करून चोखामेळा वसतीगृहाला नवे रूप प्रदान करायचे होते. पण काही कंगारभाट समाजकंटकांनी अतिक्रमण करून जवळ-जवळ त्या ठिकाणी आठ झोपड्या उभारल्या होत्या. वस्तुतः ही जमीन मा. जिल्हाधिकारी यांनी चोखामेळा वसतीगृहाला सुपूर्द केलेली होती. पण नियोजीत जागा कायमरित्या आपल्या ताब्यात मिळविण्यासाठी 16 वर्षाचा कालखंड निरंतर संघर्षाची भूमिका वठवावी लागली. जसे-मध्यप्रदेशची परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती भीमजन्मभूमीसाठी पूज्य भदन्त धर्मशील यांनी आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत अभिनव कार्य केले. तसाच लढा 2 दशके या बुद्ध विहारासाठी चालू राहिला. धम्म कार्यामुळे भदन्त एन. सुगतवंस हे अजरामर झाले. त्यांचे अद्वितीय असेच कार्य जळगाव सारख्या जिल्ह्यात येवून तळागाळात खितपत पडलेल्या पालकांच्या पाल्यांचे अंधःकारमय भविष्य उज्वल करण्यासाठी भदन्त एम. सुगतवंस या श्रीलंकेच्या धम्मदूताने केलेला अहर्निष संघर्ष अविस्मरणीय राहील. इंग्लंड, बर्गिमहॅम येथे बुद्ध विहाराचे तत्कालीन अध्यक्ष संसारीलाल आणि विश्वस्तानी निमंत्रण पाठविले. निमंत्रणावरून 1992 ते 1997 या कालावधीत धम्म कार्यासाठी तब्बल 5 वर्षे योगदान दिले. सुगत तथागत महाविहाराचे उद्घाटन 1 जुलै 2017 ला 52 किलो वजनाचा पितळी सोन्याचा मुलामा दिलेला कलश बसविला. किसा गौतमी हा 1 तास माहितीपट असलेला सहभाग प्रकाश सेजवळ यांनी भदन्त एन. सुगतवंस यांच्या मार्गदर्शनात चित्रीकरण सोहळा तोरनाळा येथे करण्यात आले. प्रबुध्द सामाजिक सेवा संस्था, बदलापूर येथे 50 वर्षाचे त्यागमय धम्माचे क्षेत्रात कार्य केल्याबद्दल 24 डिसेंबर 2017 नागरी सत्कार करण्यात आला.

2020 ते 2021 च्या कोरोना काळात व्हिडीओकॉलद्वारा उपासकाबरोबर संवाद साधून भगवान बुद्धांनी वैशाली नगरात महामारीच्या काळात रतनसुत्त प्रजेसाठी दिले त्याचे श्रवण करायला सांगितले. त्यामुळे उपासकांना खूप धीर मिळाला होता. संत चोखामेळा वसतीगृहातील असंख्य विद्यार्थी महाराष्ट्रात अनेक निजी क्षेत्रात कार्यरत आहेत. त्याचे सर्व श्रेय भदन्त एन. सुगतवंस यांना जाते. भदन्तजींची यशस्वी कारकिर्द, ज्ञानवर्धक उपक्रमाचा समावेश, दर रविवारी सामुहिक वंदनेचे आयोजन करीत असत. त्यांचा हसतमुख चेहरा. त्यांना सिंहली, इंग्रजी, तमिळ, पाली, संस्कृत, हिंदी, मराठी, इंग्रजी इ. भाषा अवगत होत्या. त्यांना महामहिम श्रीलंका रामन्या महानिकायचे पूज्य भदन्त वेवेलदोनिया मेधंकर, महामहिम राष्ट्रपती महेंद्र राजपक्षे यांचे हस्ते भारतात धम्म प्रचाराच्या कार्यात अभिनव कामगिरी केल्याबद्दल 16 मे 2010 ला 'महाराष्ट्र संघनायक' ही उपाधी श्रीलंका सरकारद्वारे बहाल करण्यात आली. भदन्त एन. सुगतवंस यांची विद्वता 1967 ते 2025 भारतातच नव्हे तर इंग्लंडसारख्या युरोपिय देशात 1992 ते 1997 पर्यंत कार्य करतात. ते अनुयायांना निरंतर स्मरणात राहील. 1970 च्या दशकात भारतात आगमन. भारतात येवून हिंदी भाषा अवगत करतात. दि. 8 तारखेला ते कोमात गेले. बघता-बघता रात्री 10.00 वा. त्यांनी अंतिम श्वास जळगावात घेतला. दि. 11 मार्च 2025 ला 12.00 वा. त्यांचे अंतिम संस्कार झाले. प्रो. डॉ. नदगम नंदवंश महाथेरा, अध्यक्ष, महामहिंद्र इ. धम्मदूत सोसायटी श्रीलंका यांच्या हस्ते, डॉ. भदन्त कहावते, सिरी सुमेध, सारनाथ, डॉ. भदन्त एन. आनंद, भदन्त नापावल प्रज्ञातिस्स, भदन्त बोधिधम्म, भदन्त संघरत्न अशा 50 भिक्षुंच्या उपस्थितीत आदरांजली दि. 14 ला 'पूण्यानुमोदन' आयोजन करण्यात आले. ■ ■



**डॉ. भदन्त चिंचाल मेत्तानंद**

## आयुष्य म्हणजे संघर्ष

**अनंतायन**



**अॅड. अनंत खेळकर**
**मो. 9370061677**

प्रत्येकाचे आयुष्य हे संघर्षातून घडत असते. जेवढी मोठी स्वप्ने तेवढा मोठा संघर्ष हे समीकरण ठरलेले आहे. जीवन जगण्यासाठी विविध संघर्षांना सामोरे जावे लागते. स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी जेवढा संघर्ष करावा लागतो, त्यापेक्षाही ती टिकवण्यासाठी करावा लागतो. जेव्हा काही कारणाने गैरसमज निर्माण होतो, तेव्हा संघर्ष जन्म घेतो. त्यामुळे कधीकधी संबंधात दुरावा तयार होतो. गैरसमजूतीचा फक्त एक क्षण वर्षानुवर्षे जपलेल्या नात्यांची राखरांगोळी करून टाकतो. मग पूर्वी कौतुक करणारे टीका करू लागतात. पण हे विसरू नये, कौतुक आणि टीका या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. त्यामध्ये संतुलन राखणे फार आवश्यक आहे. कौतुकाने हुरळून जाऊ नये किंवा वाहवतही जाऊ नये. तसेच टिकेमुळे खचूनही जाऊ नये. सकारात्मक विचार करणाऱ्या व्यक्तींच्या मते कौतुक आणि टीका या आपले व्यक्तिमत्व घडवण्यासाठी आवश्यक आहेत. यांचे तेवढेच महत्त्व आहे जेवढे रोपट्याच्या वाढीसाठी ऊन आणि पावसाचे आहे. टिकेमुळे आपल्याला स्वतःमध्ये काय सुधारणा करायची आहे ते कळते. तर कौतुकाने प्रेरणा मिळते. म्हणून टिकेला घाबरून आपल्या ध्येयाकडे पाठ फिरवू नये. कारण एकदा का ध्येय गाठले की टीकाकारसुद्धा प्रशंसक बनतात. आयुष्यात संघर्ष असायलाच हवा. ज्यांनी स्वतः कधीही संघर्ष केला नाही त्यांना आपल्या लेकरांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी दुसऱ्याचे उदाहरण देण्याची पाळी येते. केवळ श्वासोच्छ्वासाच्या बंद होण्याला मृत्यू म्हणत नाही. ती प्रत्येक व्यक्ती मृतवत असते, जी संघर्षाला सामोरे जात नाहीत. आयुष्यात जेवढा संघर्ष कठीण तेवढा माणूस मजबूत बनतो. अन् माणूस जेवढा मजबूत बनतो तेवढे जीवन सोपे होते. कारण ज्या गोष्टी तुम्हाला चॅलेंज करतात, त्याच गोष्टी तुम्हाला चेंज करतात. जेथे समस्या आहे तेथे संघर्ष हा असतोच आणि जे समस्यांचे गुलाम बनतात ते स्वतःच्या भाग्याचे निर्माते होऊ शकत नाहीत. ■ ■

बहुजन सौरभ

# जगातील पहिला मोबाईल कॉल

बेल सिस्टीम्सच्या मोबाईल टेलिफोन सर्विसने मिसुरी मधल्या सेंट लुईस या शहरात कार टेलिफोन सेवा देण्यास 17 जुन 1946 रोजी सुरूवात केली. त्या पाठोपाठ इलिनॉईस बेल टेलिफोन कंपनीने हीच सेवा शिकागो शहरात 2 ऑक्टोबर 1946 पासून सुरू केली. तत्कालीन मोबाईल फोन्स आताच्या फोन्सच्या तुलनेत अजस्त्र म्हणता येतील इतके मोठे आणि वजनाला अंदाजे 80 पाऊंड (36 किलो) होते. सुरूवातीला या फोन्सवर फक्त 3 चॅनल्सच्या माध्यमातून संवाद साधता येत असे. ही सेवा 1970-72 पर्यंत केवळ कार्ससाठीच मर्यादित होती. पण 1973 मध्ये मोटोरोलाच्या पोर्टेबल कम्युनिकेशन प्रॉडक्टसचे चीफ जॉन एफ. मिशेल यांनी छोटेखानी मोबाईल डेव्हलप करण्यात मोलाची भुमिका बजावली.

**3 एप्रिल 1973 रोजी जगातील पहिला मोबाईल फोनवरून कॉल केला गेला. पोर्टेबल फोन या संकल्पनेची सुरुवात 1946 मध्ये अमेरिकेत झाली होती.**

3 एप्रिल 1973 रोजी जॉन एफ. मिशेल यांचे साथीदार मार्टिन कूपरने आपल्या प्रतिस्पर्धी कंपनी बेल लॅब्सच्या डॉ. जोएल एनगेल याला छोटेखानी मोबाईलवरून जगातला पहिला मोबाईल कॉल लावला. या कॉल बद्दल मार्टिन म्हणाला होता, 'जेव्हा मी न्यूयॉर्कच्या रस्त्यावरून हातात फोन धरून बोलत चाललो होतो, तेव्हा रस्त्यावरील लोकांनी मला भर गर्दीतही वाट मोकळी करून दिली होती. त्यावेळी चालता-चालता मी बरेच कॉल्स केले, ज्यापैकी एक मी रस्ता ओलांडताना न्यूयॉर्क रेडिओच्या निवेदकाला केला होता, जी तो पर्यंत मी केलेली सर्वात धोकादायक गोष्ट होती.' हा जगातला पहिला मोबाईल फोन त्या काळी 3995 ला विकला गेला होता आणि त्याचे नाव होते, 'द ब्रिक'. त्या नंतर या क्षेत्रात अतिशय वेगाने बदल घडत गेले. 1979 साली जपान मध्ये टोकियोच्या काही भागांसाठी सेवा देणारे NTT हे जगातले पहिले कमर्शियल सेल्युलर नेटवर्क उभे राहिले. तरीही, नागरिकांसाठी पहिला फोन जवळपास 10 वर्षांनी बाजारात आला. तो होता मोटोरोला DynaTAC 8000X.



6 मार्च 1983 रोजी हा फोन बाजारात आला. हा फोन 2995 ला विकला गेला. गंमत म्हणजे याचा टॉकटाईम होता फक्त 30 मिनीटे आणि याची बॅटरी चार्ज करण्यासाठी वेळ लागत असे 10 ते 11 तास.

भारतात मोबाईल फोन्स यायला 90चे दशक उजाडावे लागले होते. 31 जुलै 1995 रोजी भारतातील मोबाईल सेवा सुरू झाली. कोलकात्यातून 31 जुलै 1995 रोजी पहिला मोबाईल कॉल लावण्यात आला, हा कॉल केला होता पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री ज्योती बसू यांनी. मोबाइलचे जाळे देशात पहिल्यांदा कोठे अंथरले जाईल तर ते कोलकात्या मध्येच, हा त्यांचा हट्टाग्रह होता. ते सुरू झाले तेव्हा त्यांनी रायटर्स बिल्डींग मधून तेव्हाचे केंद्रीय दूरसंचारमंत्री सुखराम यांना पहिला मोबाईल फोन केला. भारतातील पहिली मोबाईल ऑपरेटर कंपनी मोदी टेल्स्ट्रा (आताची स्पाईस) होती. त्याच्या सेवेचे नाव मोबाईल नेट असे होते व यासाठी नोकिया-2110 हा हॅंडसेट वापरला गेला होता. त्यावेळी फक्त मूलभूत सुविधा असलेला मोबाईल तब्बल 25 ते 45 हजारांना होता. देशातील पहिला मोबाईल कॉल याच नेटवर्क वरून करण्यात आला होता. अन्य देशांच्या तुलनेत भारतात मोबाईल सेवा अधिक लोकांपर्यंत पोहचण्यास वेळ लागला. याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे महाग कॉल दर होते. सुरुवातीच्या काळात एका आऊटगोइंग कॉलसाठी प्रती मिनिटाला 16 रुपये मोजावे लागत. आऊटगोईंग कॉल्स बरोबरच इनकमिंग कॉल्ससाठी देखील पैसे द्यावे लागत होते. ■ ■

**संजीव वेलणकर**
**मो. 9422301733**

**संकलन – मिलिंद पंडित**

# अभिनंदन भीम कन्या ऋतुजा!

***भीम कन्या ऋतुजा अहिरे एक 19 वर्षाची मुलगी. राहणार संगमनेर. परंतु फेब्रुवारी आणि मार्च महिन्यामध्ये तिने आपल्या कर्तृत्वाने सिद्ध केले आहे की ती एक खरोखरच भीम कन्या आहे.***






सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या आईने सरकारी 10 लाखाची मदत नाकारली. त्यावेळी तिने स्वतः एक ग्रुप स्थापन करून त्या मातेला एक लाखाहून जास्त मदत केली. स्वतः घरी कुटुंबातली असून देखील तिला माणुसकीची जाण आहे आणि जणू काय माणूसकी हाच तिचा प्राण आहे.

या उदात्त हेतूने प्रेरित झालेले एक व्यक्तिमत्व आहे. तिच्या कामाची दखल घेऊन तिला मार्च महिन्यामध्ये दादर ठिकाणी आणि चेंबूर ठिकाणी तिचा सन्मान करण्यात आला.

ज्यावेळी डॉ. रवींद्र जाधव, डॉ. सुरेखा जाधव यांच्या अनाथ आश्रमासाठी ऑर्केस्ट्राचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला त्यावेळी देखील तिने व्हाट्सअप ग्रूप तयार करून त्या ग्रूपच्या माध्यमातून तो कार्यक्रम यशस्वी करून दाखवला. त्या कार्यक्रमांमध्ये तिचा सर्वात मोलाचा वाटा आहे. त्यामुळे तिला त्या कार्यक्रमाच्या वेळी आदर्श भीम कन्या पुरस्कार देण्यात आला आणि तिची संविधान सैनिक महिला ब्रिगेड कार्याध्यक्षपदी निवड करण्यात आली. अगदी कमी वयामध्ये आपल्या आयुष्यात प्रचंड मेहनत करून आपले काम करणे व जे अशक्य असेल ते शक्य करणे ही तिची खासियत आहे आणि तिच्या आणि तिच्या केलेल्या कामाचे कौतुक म्हणून डॉ. रवींद्र जाधव यांनी तिची संविधान सैनिक महिला ब्रिगेड कार्याध्यक्षपदी निवड केली. सतत कार्यरत राहून समाज उपयोगी कामे करणे हाच तिचा महत्त्वाचा गुण आहे. तरी अशा या भिमकन्या ऋतुजाला खूप खूप शुभेच्छा आणि आपली निवड ती सार्थ करील यात कोणती शंका नाही. ■ ■

**– संजय पवार**

## वाचकांचे मनोगत

बहुजन सौरभ

# नव्या युगाचा मंगल ध्वनी

आपण तत्वज्ञानान उच्च पण व्यवहारात पशुतुल्य गणले गेलो आहोत यांत मला तरी शंका नाही. या कठीण साखळीतून बाहेर पडण्याकरीता आपणाला आजचा रूढ धर्म, सध्याची दिखाऊ देशभक्ती चालू राजकारण शैली व प्रचलित वर्णाश्रम योजना यांत नुसती वरवर डागडूजी न करतां या गोधंळात मूठमाती देऊन यातून एक नवीन धारणा व नवंयुगच निर्माण केले पाहिजे; तरच माणसाला आदर्श मानवतेचे दर्शन व ज्ञान होईल. बारा महिने मर-मर राबूनही जर पोटभर खायला मिळत नाही की कधी पुरेसे वस्त्र सापडत नाही, दवा पाण्याची किंवा निवाऱ्यांची राहण्याची सोय नाही, तर त्या दुःखी जीवांच्या दृष्टीने रामराज व रावणराज्य यात फरक तो कसा दिसणार? वास्तविक भारताला लाभलेल्या या स्वराज्याला रामराज्य बनवायचे की रावणराज्य ही गोष्ट आपल्यावरच अवलंबून आहे. सुशिक्षित, श्रीमंत, देशभक्त, साधुसंत व सत्ताधिश यांनी मनात आणल्यास आजच हे राष्ट्राचे स्वरूप पालटून टाकू शकतात. परंतू त्यांना जर आपल्या सुस्थितीचा मोह सोडवत नसेल तर सध्याच्या भयानक जीवन कलहाने पीडलेली असंतुष्ट गरीब जनता, पदोपदी ठोकरा देणारा हा निसर्ग, वाढलेली लोकसंख्या व घटलेले उत्पादन, बेसुमार महागाई आणि प्राथमिक गरजांच्या वस्तूंची टंचाई, 'गचांडी' देऊन असे जबरीने करायला भाग पाडील. तुम्हीच काय, तुमच्या छायेला सुद्धा आता नवे युग थांबवता येणार नाही. ■ ■

**– संकलन**
**डी. एन. लाखे**

# आयडेंटिटी



सरकारी तळे सर्वांसाठी खुले. आम्हाला सोडून सर्व पाणी पितात.. कुत्री .. मांजरी देखिल.. मात्र आम्हाला मज्जाव.. असे का.. आमची आयडेंटिटी काय? हा सवाल करत डॉ. बाबासाहेबांनी पेटवले चवदार तळे, अन जाळली त्यात मनुस्मृती.

भारत सरकार कायदा 1919. यात काही संवैधानिक सुधारणा करण्याची गरज आहे का हे धुंडाळण्यासाठी 1927 साली सायमनचे कमिशन भारतात आले. या समितीत भारतीय लोक प्रतिनिधी म्हणून नाहीत, यास्तव या समितीवर गांधीच्या पुढाकाराने देशभरातून बहिष्कार टाकण्यात आला. मात्र या बहिष्काराला फाट्यावर मारत डॉ. बाबासाहेबांनी सायमन समिती समोर गाऱ्हाणी मांडली. मुद्दा हाच होता. देशाच्या वतीने सायमन कमिशनवर बहिष्कार टाकतांना आम्हाला का गृहीत धरले गेले. आमच्याही मागण्या असू शकतात हे का मनाला शिवले नाही.

***सरकारी तळे सर्वांसाठी खुले. आम्हाला सोडून सर्व पाणी पितात.. कुत्री .. मांजरी देखिल.. मात्र आम्हाला मज्जाव.. असे का.. आमची आयडेंटिटी काय? हा सवाल करत डॉ. बाबासाहेबांनी पेटवले चवदार तळे, अन जाळली त्यात मनुस्मृती.***

**प्रश्न तोच..आमची आयडेंटिटी काय..?**

डॉ. बाबासाहेबांनी सायमनच्या समितीसमोर गाऱ्हाणी मांडली ज्याची फळे आजही आपण चाखतोय.. इंग्रजांपासून देशमुक्तीसाठी रान पेटलेले. अख्खा देश उभा-आडवा धुमसत होता. पण त्यात डॉ. बाबासाहेब नव्हते. कारण प्रश्न हा होता की इंग्रजमुक्त भारतात आपले स्थान काय असणार? 'आधी देशाची मुक्ती होवु द्या, मग ठरवता येईल आपसात बसून कोणाचे काय स्थान असणार?' या असल्या बालिश उत्तराला डॉ. बाबासाहेबांनी धुडकावून लावले म्हणून आज आपण, 'आपण' आहोत.

**हाच विषय 'आमची आयडेंटिटी काय?'**

काळाराम मंदिर सत्याग्रहात.. गोलमेज परिषदेत.. गांधी सोबतच्या हमरीतुमरीत.. संविधान सभेत शिरण्यासाठी.. जातीअंताच्या लढाईत..अन शेवटी जातिअंत करण्यासाठी केलेल्या धर्मांतरात... धम्म दिक्षेच्या वेळी देखील अस्तित्वात असलेल्या सत्राशेसाठ बौद्ध पंथात आपली आयडेंटिटी विरून जावू नये व ती वेगळीच रहावी या उद्देशाने डॉ. बाबासाहेबांनी मांडले की, 'धर्मांतरीत बौद्ध हे बुद्धाची मूळ शिकवणूक पाळतील. ते स्वतःला बौद्ध धम्मातील वज्रयान, महायानसारख्या इतर पंथांपासून दूर ठेवतील. त्यांचा धम्म 'नवयान' प्रकाराचा असेल'. विकृत हिंदू धर्माने लादलेल्या अस्पृश्यतेमुळे स्वतःचा चेहराच गमावून बसलेल्या आम्हा गुलामांना या जातरहित नवयान बौद्ध धम्माची मजबूत आयडेंटिटी दिली डॉ. बाबासाहेबांनी. ही आपली आयडेंटिटी उत्तरोत्तर वृद्धिंगत होत जावी व कालांतरानं सारा देश बौद्धमय व्हावा ही डॉ. बाबासाहेबांची इच्छा अन ती कार्यान्वित करण्यासाठी त्यांनी स्थापिली ती 'भारतीय बौद्ध महासभा'.

महाकुंभच्या नौटंकीत सामिल झालेल्या संघी भिक्षुकांचा नंगानाच निर्विकारपणे न्याहाळत बसलो. अन् आता हे महाबोधी महाविहार मंदिर मुक्ति आंदोलन.. डॉ. बाबासाहेबांनी नाकारलेल्या महायानी, वज्रयानी, कालचक्री, तांत्रिक इत्यादि चमत्कारिक बुद्ध मानणाऱ्या 'बौद्ध पंडितांनी', महाबोधी महाविहार मंदिराच्या 9 सदस्यीय व्यवस्थापन समितीत 100 टक्के सहभाग यासाठी चालविलेले आंदोलन स्वरूपातील हे अभियान. 'महाबोधी महाविहार मंदिर' याचे व्यवस्थापन हे, 'बुद्धगया मंदिर अधिनियम 1949 (BT ACT 1949)' अन्वये बिहार राज्यसरकारचा अखत्यारीत आहे. या कायद्यानुसार 9 जणांच्या व्यवस्थापकीय समितीत 1 अध्यक्ष (जिल्हाधिकारी), 4 भारतीय बौद्ध व 4 भारतीय हिंदू असायला हवेत. याशिवाय एक सल्लागार समिती असावी. ज्यात बहुतांश बौद्ध (भारतीयच असावेत असे नाही) हवेत. या व्यतिरिक्त अत्यंत महत्वाचे म्हणजे या कायद्यानुसार, या कायद्यात किंवा कायद्याच्या अंमलबजावणीसाठी बनविलेल्या नियमांमध्ये काहीही असले तरी हिंदू व बौद्ध धर्माच्या कुठल्याही पंथाला मंदिरात पुजेसाठी वा मंदिराच्या जमिनीवर पिंडदान करण्यासाठी प्रवेश नाकारला जाणार नाही.

अर्थात... आंदोलनाने BT ACT 1949 जर रद्द झालाच तर जे हशील होणार. ते म्हणजे व्यवस्थापकीय समितीत सगळेच्या सगळे बौद्ध असतील, मात्र ते बौद्ध भारतीय असावेत ही 'अट' राहणार नाही.

महत्वाचे म्हणजे BT ACT 1949 रद्द झाला तरी महाबोधी मंदिराच्या जमीनीवर चालणारे 'पिंडदान' बंद होणार नाही. कारण हे पिंडदान व मंदिरात पूजा करण्यासाठी हिंदूंना प्रवेश या बाबी कायद्यानुसार सुरू झालेल्या नाहीत. उलटपक्षी या कायद्यात काही असले तरी 'पिंडदान व हिंदूंना मंदिरात प्रवेश' बंद करता येणार नाही असा आशय कायद्यात आहे. तर अशा या आंदोलनात जिथे आपली काही आयडेंटिटीच नाही. तिथे आपण अगदी स्वखुशीने लुडबुड करु लागलोय... इथे मुद्दा डॉ. बाबासाहेबांनी आपल्याला दिलेल्या बौद्ध आयडेंटिटीचा आहे. महाबोधी महाविहार मंदिर मुक्ति आंदोलनात आपण भाग घेत आहोत त्यात आपली आयडेंटिटी काय आहे?

डॉ. बाबासाहेबांनी आपल्याला दिलेल्या नवयानी बुद्धाला या आंदोलनात काही स्थान तरी आहे का? हे साधे प्रश्न आपल्याला का पडत नाहीत? बुद्धाला ब्राह्मण पंडितांपासून मुक्त करायचे या गोंडस नावाने आपण प्रतिक्रांतीच्या पालखीचे भोई होत आहोत याचे साधे भान देखील आपल्याला राहिलेले नाही. डॉ. बाबासाहेबांनी बुद्ध समजण्यासाठी तीन पुस्तके लिहित असल्याचे सांगितले होत. पहिले 'बुद्ध आणि त्याचा धम्म'. दुसरे 'बुद्ध आणि कार्ल मार्क्स' आणि तिसरे 'प्राचीन भारतातील क्रांति आणि प्रतिक्रांती'.

**मिलिंद भवार**
**मो. 9833830029**

डॉ. बाबासाहेबांचे पहिले पुस्तक 'बुद्ध आणि त्याचा धम्म', जगभरातील बौद्ध पंडितांनी विशेषकरून महाबोधी महाविहार मंदिर मुक्तिसाठी पुढाकार घेतलेल्या बौद्ध पंडितांनी सपशेल नाकारलेले असे हे पुस्तक. 'बुद्ध आणि कार्ल मार्क्स' संदर्भात डॉ. बाबासाहेब म्हणतात की, बुद्ध आणि मार्क्स दोघांचेही इस्पित एकच... मार्ग मात्र वेगळे. बुद्धाचा मार्ग अधिक शास्वत. महत्वाचे म्हणजे डॉ. बाबासाहेब विचारतात बुद्ध हा मार्क्सला उत्तर देवु शकतो का? निश्चितपणे डॉ. बाबासाहेबांचा बुद्ध, अफूची गोळी या संदर्भात, मार्क्सला उत्तर देतो. मात्र, महाबोधी महाविहार मंदिर परिसरात असलेल्या बौद्ध मठांच्या आखाड्यातील बुद्ध, मार्क्सला उत्तर देवू शकत नाहीत. महाबोधी महाविहार मंदिर इथे स्थायिक असलेल्या अन ते मुक्त करण्यास पुढाकार घेतलेल्या कर्मकांडी, चमत्कारी, कालचक्री, महायानी, वज्रयानी, तांत्रिक, पोथीनिष्ठ बुद्ध मानणाऱ्या बौद्ध पंडितांच्या लेखी असे 'क्रांती अन प्रतिक्रांती' काही नाहीच. कारण त्यांचा बुद्ध वेगळ्या वातावरणातला. वेगळ्या कारणांसाठी जन्माला आलेला. अशारित्या, बुद्ध समजण्यासाठी ज्या तीन विषयांची वाच्यता डॉ. बाबासाहेबांनी केली अन जे आपल्या 'बौद्ध आयडेंटिटीचा प्रमुख आधार' आहेत, ते तिन्ही विषय महाबोधी महाविहार मंदिर ताब्यात घ्यायला निघालेल्या बौद्ध पंडितांच्या मात्र खिजगणतीतही नाहीत. म्हणूनच महाबोधी महाविहार मंदिर मुक्तीच्या आंदोलनात आपली आयडेंटिटी काहीच नाही, निव्वळ एक भावनिक 'शून्य.' या आंदोलनामुळे मात्र, डॉ. बाबासाहेबांनी आपल्याला दिलेली 'बौद्ध' आयडेंटिटी ठणकावून सांगण्याची सुवर्णसंधी आपल्याला लाभलीय. महाबोधी महाविहार मंदिराच्या व्यवस्थापन समितीत सध्या धम्माधिरू (प्रेमा भंते), आद. टी ओकोनाजी आणि किरण लामा असे तीन भारतीय बौद्ध आहेत. तसेच या मंदिरात पूजाअर्चा करण्यासाठी आद. भिक्खू चालिंदा, आद. भिक्खू दिनानंद, आद. भिक्खू बुद्ध रत्न, आद. भिक्खू धम्मिका, आद. भिक्खू सासना, आद. भिक्खू धम्मिसारा, आद. भिक्खू कौंडीण्य, आद. नीमा लामा, आद. दिपन भंते असे नऊ (9) देशी-विदेशी बौद्ध भिक्खू आहेत. या 12 बौद्धांनी मिळून महाबोधी महाविहार मंदिर व्यवस्थापनाचे अध्यक्ष गयाचे जिल्हाधिकारी डॉ. थियागराजन एस एम (IAS) यांना लेखी प्रस्ताव द्यायचा की, 'महाबोधी विहाराच्या मुख्य दरवाजाच्या चौकटीवर अगदी ठळक अक्षरात 22 प्रतिज्ञा कोरण्यात याव्यात व या प्रतिज्ञा पाळणे हे महाविहार परिसरातील सर्वच भिक्खू-पुजाऱ्यांना बंधनकारक राहील' अशी मागणी आपण करायला हवी. जर ही मागणी मान्य केली गेली अन तसा लेखी प्रस्ताव व्यवस्थापन समितीतील 3 देशी बौद्ध व पूजाअर्चा करणारे 9 देशी-विदेशी बौद्धांनी अध्यक्षांकडे दिला तरच या आंदोलनात सहभागी होण्यास काही अर्थ आहे. कारण मग आपली आयडेंटिटी मान्य केली जाईल. अन्यथा नाही.

22 प्रतिज्ञांचा आपला प्रस्ताव आणि दलाई लामा संदर्भातील आपला प्रश्न, हे सांगून टाळला जाणार, की आधी मुक्ती होवू द्या मग पुढचे पुढे बघू.. अन हे सांगायला आपलेच 'बाटगे' पुढाकार घेतील. पण एक लक्षात ठेवा, महाबोधी महाविहार येथिल बुद्धाला खऱ्या अर्थाने 'पोंगा पंडितांच्या' तावडीतून मुक्त करायचे असेल तर त्यावर एकमात्र उतारा म्हणजे '22 प्रतिज्ञा' हाच होय. अन हे ठणकावून मांडण्यासाठी कोणाचाही मुलाहिजा ठेवण्याची अजिबात गरज नाही. कारण आपल्याला माणूस म्हणून जगण्याची जी आयडेंटिटी मिळालेली आहे. ती केवळ अन केवळ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळे होय. महाबोधी महाविहार मंदिर मुक्ती आंदोलनाला या अंगाने पाहणे नितांत आवश्यक व काळाची खरी गरज! ■ ■

# 'आंबेडकरी बाप' ग्रंथाचे प्रकाशन 6 एप्रिल रोजी

**मुंबई :** 'आंबेडकरी बाप' या ग्रंथाचा प्रकाशन समारंभ सर्वेश सभागृह, डोंबिवली, मुंबई येथे दि. 6 एप्रिल 2025 रोजी सकाळी 10.30 वाजता महाराष्ट्र शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समितीचे सदस्य सचिव आणि सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. प्रदीप आगलावे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. तर ग्रंथाचे प्रकाशन मुंबई महानगरपालिकेचे नगर अभियंता महेंद्र उबाळे यांच्या हस्ते होईल. या ग्रंथाचे संपादक ज्येष्ठ साहित्यिक प्रा. शक्राचार्य गायकवाड हे आहेत. याप्रसंगी केशव भोईर, प्रा. दामोधर मोरे, डी. टी. गायकवाड, कृणाल कांबळे (संपादक, दै. सम्राट) हे पाहुणे म्हणून उपस्थित राहतील. या ग्रंथावर डॉ. इंदिरा आठवले(नाशिक) आणि प्रा. भारत सिरसाट (जळगाव) हे भाष्य करतील.




प्रस्तुत ग्रंथाची प्रस्तावना सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर यांनी लिहिली असून ग्रंथाच्या मलपृष्ठावर डॉ. प्रदीप आगलावे यांनी ब्लर्ग लिहिला आहे. या ग्रंथात डॉ. यशवंत मनोहर, ज. वि. पवार, डॉ. प्रदीप आगलावे, प्रा. उषा काळे, बी. डी. जाधव, डॉ. धनराज डहाट, प्रा. दामोदर मोरे, किरण सोनवणे, दीपश्री बलखंडे, प्रा. उत्तम भगत, शांताराम निकम, सीताराम गायकवाड, रेखा कांबळे, विद्या भोरजारे, प्रा. भास्कर गवाणकर, डॉ. विठ्ठल शिंदे, डॉ. सुरेंद्र शिंदे, प्रभाकर थोरात, भीमराव रायभोळे, प्राचार्य रमेश जाधव, डॉ. सिद्धार्थ मोरे, कांतीलाल भडांगे, नारायण येळगावकर, ॲड. धम्मकिरण चन्ने, प्रा. भारत सिरसाट, चंद्रकांत पोळ, सुनीता इंगळे, प्रा. विजय मोहिते, प्रा. शुक्राचार्य गायकवाड इत्यादी लेखकांचे लेख आहेत.

## नक्षलवाद्यांच्या शांतीप्रस्ताव पत्रकाने चर्चेला उधाण



**गडचिरोली :** मागील दोन वर्षापासून छत्तीसगड, महाराष्ट्रातील गडचिरोली, तेलंगणा, ओडिशा आणि झारखंड येथे नक्षलवाद्यांविरोधात सुरू असलेल्या आक्रमक कारवायांमुळे घाबरलेल्या नक्षल्यांनी केंद्र सरकारपुढे शांतीचा प्रस्ताव ठेवल्याचे समोर येत आहे. सरकारने कारवाया थांबवून चर्चा करावी, असे आवाहन करणारे पत्रक बुधवारी प्रसारमाध्यमांना प्राप्त झाले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा शुक्रवारी छत्तीसगड दौऱ्यावर येत असताना नक्षलींच्या केंद्रीय समितीचा सदस्य अभय उर्फ सोनू भूपतीच्या नावाने जारी झालेल्या या पत्रावरून चर्चेला उधाण आले आहे.पत्रात नमूद केलेल्या माहितीनुसार, 24 मार्च रोजी हैदराबाद येथे एक गोलमेज बैठक घेण्यात आली. त्यात मध्य भारतात सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये सुरू असलेला संघर्ष थांबवण्यात येऊन शांतीवार्ता केली पाहिजे, असे ठरवण्यात आले. या परिषदेला नेमके कोण उपस्थित होते, याविषयीची कुठलीही माहिती पत्रकात देण्यात आलेली नाही.



## भीम सेनेचे संविधान चौकात 25 दिवसांपासून उपोषण

### महाबोधी महाविहार मुक्तीसाठी

**नागपूर :** बुध्दगया येथील महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात देण्यासाठी देशभर आंदोलन सुरू आहे. या मागणीसाठी 134 वर्षापासून आंदोलन सुरू आहे. बिहार येथील आकाश लामा, बुध्दीस्ट सोसायटी ऑफ इंडिया, समता सैनिक दल तसेच देशातील अन्य बौध्द संघटना व संस्थांच्या माध्यमातून 12 फेब्रुवारीपासून संविधान चौकात साखळी उपोषण सुरू आहे. भीम सेनेचे राष्टीय अध्यक्ष श्रीधर साळवे यांच्या नेतृत्वात उपोषण करण्यात आले. त्यांच्यासह शहर प्रमुख गुणवंत सोमकुवर, समता सैनिकदल प्रमुख कैलाश देशभ्रतार, सुरेश नखाते, अजय तभाने, विशाल मेश्राम, सारिपुत्र वानखेडे सहभागी झाले होते. या आंदोलनाला 24 दिवस झाले आहेत.




**त्रिशरण बुद्ध विहार आशीर्वाद नगर. नागपूर.**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय अभ्यासिका व विपश्यना केंद्र आशीर्वाद नगर नागपूर. अध्यक्ष - यशोधरा तामगाडगे, सचिव- प्रीत शाक्य. महामानवांची जयंती, वर्षावास, विपश्यना तसेच अनेक बौद्धिक उपक्रम राबवण्यात येते.

संवाद मित्र
प्रिती तिरपुडे

## महाराष्ट्रातील या जिल्ह्यांना आज पावसाचा ऑरेंज अलर्ट, वादळी वारा, विजांचा कडकडाट

**नागपूर :** महाराष्ट्राच्या हवामानात सातत्याने बदल होत असून भारतीय हवामान खात्याने आज काही जिल्ह्यांना पावसाचा 'ऑरेंज अलर्ट' दिला आहे. राज्याच्या अनेक भागात वादळी वारे आणि गारपीटीसह हलक्या ते मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील काही जिल्ह्यांसाठी 'ऑरेंज अलर्ट' देण्यात आला आहे तर कोकणात हलक्या पावसाचा अंदाज आहे.

दरम्यान, राज्यातील अनेक भागात कमाल तापमानात चार ते पाच अंश सेल्सिअसने घट झाली आहे. विदर्भातील तापमानाचा पारा चांगलाच चढला होता. गेले काही दिवस अनेक शहरांमधील तापमान 42 अंश सेल्सिअसपलीकडे गेले होते. तर अनेक शहरांमध्ये तापमानाचा पारा 40 अंश सेल्सिअसपेक्षा अधिक होता. मात्र, गेल्या दोन दिवसांपासून विदर्भासह राज्यातील सर्वच ठिकाणचे हवामानाचे चित्र पालटले आहे.

मंगळवारी मध्यरात्री नागपूर येथे वादळी वाऱ्यासह पाऊस कोसळला. पावसापेक्षाही वादळीवाऱ्याचा जोर अधिक होता. तर बुधवारी सायंकाळी देखील वादळी वाऱ्यासह पाऊस कोसळला. वर्धा जिल्ह्यात देखील वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावली. तर आजदेखील दुपारनंतर गारपीट आणि वादळी वाऱ्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. नागपुरात हवामान तीव्र राहील, जिथे कमाल तापमान 39 अंश सेल्सिअस आणि किमान 23 अंश सेल्सिअस नोंदवले जाईल. तर अकोला, अमरावती आणि चंद्रपूर जिल्ह्याला पावसाचा ऑरेंज अलर्ट दिला आहे. दरम्यान, प्रादेशिक हवामान खात्याने आक नागपूरसह बुलडाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, भंडारा, गोंदिया या जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यता वर्तवली आहे.



## महत्वाचे

### ह्युमन राइट्स जस्टिस असोसिएशनची चिंतन बैठक



**अकोला :** ह्युमन राईट्स जस्टिस असोसिएशन अकोला जिल्ह्याची बैठक शासकीय विश्राम भवन अकोला येथे जिल्हाध्यक्ष प्रा. सुरेश मोरे यांच्या अध्यक्षतेखाली चिंतन बैठक घेण्यात आली. प्रमुख पाहुणे राष्ट्रीय सचिव संघपाल सिरसाट, महाराष्ट्र सचिव राहुल जाधव हे होते. त्या बैठकीमध्ये तालुका व जिल्हा स्तरावर मिटींग घेऊन संघटनेची कार्यकारिणी तयार करणे, समाजाच्या समस्या सोडवून न्याय मिळवून देणे, शैक्षणिक समस्या, बेरोजगार समस्या, पेन्शन समस्या, जेष्ठ नागरिकांच्या समस्या व प्रत्येक बहुजन समजातील गोरगरीब, शेतकरी, शेतमजूर, सुशिक्षित बेकारी कामगार इत्यादीच्या समस्या सोडवून त्यांना न्याय देण्याचे कार्य संघटना करणार असे विचार मांडण्यात आले आणि सर्व संत महापुरुषांच्या जयंत्या साजऱ्या करून प्रबोधन द्वारे जनजागृती करून सामाजिक किंवा कोणत्याही प्रकारचा अन्याय होत असेल त्यांना न्याय मिळवून देऊन देशहीत साधने हे विचार बैठकीमध्ये सर्वांनी मांडले. या चिंतन बैठकीला ह्युमन राईट्स जस्टिस असोशियशनचे राष्ट्रीय सचिव संघपाल सिरसाट, महाराष्ट्र सचिव राहुल जाधव, अकोला उपाध्यक्ष राजविलास वानखडे, प्रा. प्रमिला बोरकर सहसचिव, प्रा. प्रदीप चोरे, सुरेश मोरे (चांदुर)जिल्हा प्रसिद्धी प्रमुख मंगेश झिने, करूणा सिरसाट, संजय भाऊ मेश्राम, अबरार अहमद, खांडेकर, इतर अनेक प्रतिष्ठित उपस्थित होते.

### वडेट्टीवार : आशिष शेलार गुप्त बैठकीने राजकीय खळबळ



**चंद्रपूर :** विधानसभा अर्थसंकल्पीय अधिवेशन काळात काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते आमदार विजय वडेट्टीवार राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षात प्रवेशाची जोरदार चर्चा सुरू होती. ही चर्चा मागे पडत नाही तोच भाजप मुंबई शहर अध्यक्ष तथा राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार, काँग्रेस नेते आमदार विजय वडेट्टीवार व त्यांचे कट्टर राजकीय विरोधक चिमुरचे आमदार कीर्तीकुमार भांगडीया यांनी एकाच गाडीतून प्रवास करीत मूल एमआयडीसी येथील वडेट्टीवार यांच्या इथेनॉल फॅक्टरत बैठक घेतल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. दरम्यान वडेट्टीवार यांचा राजकीय प्रवास नेमका कुठल्या दिशेने सुरू आहे याबाबत देखील राजकीय वर्तुळात तर्कवितर्क सुरू आहेत. विशेष म्हणजे वडेट्टीवार यांच्या इथेनॉल कारखान्याचे उद्घाटन लवकरच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस करणार असल्याची माहिती आहे.

## बुद्धिस्ट सेमिनरी उंटखाना येथे आज सम्राट अशोक जयंती




**नागपूर :** सम्राट अशोक जयंती दिनांक 4 एप्रिल 2025 सायंकाळी 6 = 30 ते 9 - 30 उद्घाटन - भन्ते आर्य नागार्जुन सुरेई ससाई, अध्यक्ष भदन्त धम्मसारथी (बुद्धिस्ट सेमिनरी, उंटखाना, नागपूर) प्रमुख पाहुणेसिद्धार्थ गायकवाड (उपायुक्त, समाज कल्याण व न्याय विभाग) धनंजय वंजारी (ॲडिशनल कमिश्नर, इन्कम टॅक्स) वक्ते प्रा. सुजित बोधी (बुद्धिस्ट स्टडीज, आंबेडकरी विचारधारा, रातुम नागपूर विद्यापीठ) या प्रसंगी समाजातील काही नामवंताचा सत्कार करण्यात येईल. दि. 05 /04 / 2025 सायं. 6 = 30 वाजता सम्राट अशोक जयंती निमित्त 'धम्मरॅली'चे आयोजन करण्यात येणार आहे असे आव्हान बुद्धिस्ट सेमिनरी उंटखाना, नागपूर, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल, रमाई स्मारक बुद्ध विहार, उंटखाना, नागपूर, भिमस्मृती बुद्ध विहार, चंदननगर, नागपूर, ह्युमन राईट्स प्रोटेक्शन फोरम (एचआरपीएफ), नागपूर, प्रोगेसिव्ह आंबेडकराईट हेल्थ केअर अँड सोशल ऑर्गनायझेशन, डॉ. आंबेडकर सोशल फोरम, नागपूर दीक्षाभूमी बचाव सौंदर्याकरण समिती त्यागमुर्ती रमाई सोशल फाऊंडेशन, बौद्ध संस्कृती संवर्धन समिती, तसेच विविध आंबेडकरी संघटना यांनी केले आहे.

## 'एमपीएससी'मध्ये मराठा उमेदवारांसमोर अपात्रतेचा धोका!

**नागपूर :** राज्यात मराठा आरक्षण लागू झाल्यावर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 साठी सुधारित अर्ज करताना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गातील (एसईबीसी) काही उमेदवारांनी 'नॉन क्रिमिलेअर' प्रमाणपत्राची माहिती न दिल्याने त्यांचे सुधारित अर्ज बाद ठरले. यामुळे असे उमेदवार 'ईडब्ल्यूएस' प्रवर्गातच राहिले. आयोगाने हा गुंता सोडवण्यासाठी पूर्व परीक्षेचा सुधारित निकाल जाहीर करून 318 नवीन 'ईडब्ल्यूएस' उमेदवारांना अर्जाची संधी दिली. तर मुख्य परीक्षेचा अर्ज करताना 'एसईबीसी' उमेदवारांना नॉन क्रिमिलेअर' प्रमाणपत्र 'आहे' किंवा 'नाही' हा दावा करण्याची पुन्हा संधी दिली. मात्र, न्यायालयाच्या यापूर्वीच्या निकालानुसार, एकापेक्षा जास्त टप्पे असलेल्या परीक्षेत पहिल्या टप्प्यात जी परिस्थिती असते, ती नंतर बदलणे कायद्याने अवैध ठरते. त्यामुळे भविष्यात कायदेशीर पेच निर्माण होऊन मुलाखतीनंतर 'एसईबीसी' उमेदवार अपात्र ठरण्याचा धोका आहे.



नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा 2024 ची जाहिरात डिसेंबर 2023 मध्ये प्रसिद्ध झाली. यावेळी राज्यात मराठा आरक्षण लागू झाले नव्हते. त्यामुळे काही मराठा उमेदवारांनी खुल्या तर काहींनी 'ईडब्ल्यूएस' प्रवर्गातून अर्ज केले. अर्जाची मुदत संपल्यावर फेब्रुवारी 2024 मध्ये राज्यात सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) आरक्षण लागू झाले. यादरम्यान मराठा समाजातील अनेकांना इतर मागास (ओबीसी) प्रमाणपत्र देण्याची मोहीम राबवण्यात आली.

### कैद्यांची संख्या दुप्पट, सुरक्षेसाठी मनुष्यबळ कमी

## राज्यातील कारागृहांची समस्या गंभीर

**नागपूर :** राज्यातील कारागृहांत कैद्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून कारागृंहाच्या सुरक्षेसाठी असणाऱ्या अधिकारी आणि सुरक्षारक्षकांची संख्या कमी आहे. राज्य कारागृह विभागात जवळपास 40 टक्के पदे रिक्त असून उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांवर सुरक्षेचा ताण वाढला आहे. राज्यात 6 हजार 68 सुरक्षारक्षकांची पदे मंजूर असून प्रत्यक्षात मात्र 3 हजार 682 सुरक्षारक्षकच तैनात आहेत, अशी माहिती पुणे महासंचालक कार्यालयातून मिळाली आहे.



राज्यातील प्रत्येक कारागृहात क्षमतेपेक्षा दीडपट ते दुप्पट कैदी कोंबल्या जात आहेत. तसेच राज्यातील अनेक कारागृहात कैद्यांमध्ये वाद आणि हाणामारीच्या घटना समोर येत आहेत. कैद्यांवर नियंत्रण ठेवणे किंवा त्यांना शिस्त लावण्यासाठी मोठा ताफा तैनात करावा लागतो. मात्र, राज्य कारागृहात जवळपास 40 टक्के पदे रिक्त असून उपलब्ध असलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षा व्यवस्था सांभाळण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. कमी मनुष्यबळात क्षमतेपेक्षा जास्त असलेल्या कैद्यांचा ताण कारागृह प्रशासनावर पडत आहे. राज्यात नऊ मध्यवर्ती, 28 जिल्हा, 19 खुली व इतर अशी एकूण 60 कारागृहे आहेत. या कारागृहांची क्षमता 24 हजार असताना कारागृहात सध्या 39 हजारांवर कैदी आहेत. कारागृहात क्षमतेपेक्षा कैदी जास्त आहेत. राज्य कारागृह विभागासाठी 7 हजार 68 पदे मंजूर आहेत. त्यापैकी 4 हजार 328 पदे कार्यरत आहेत. अजुनही 2740 पदे रिक्त असल्याचे समोर आले आहे. मध्यवर्ती कारागृह अधिक्षक व जिल्हा कारागृह अधिक्षकांची पदेसुद्धा रिक्त असल्याची माहिती समोर आली आहे. तसेच प्रत्यक्ष कारागृहात कामाची अंमलबजावणी करणारे रक्षकांची 2385 पदे भरली नसल्याचे समोर आले आहे. कारागृहात सुरक्षाव्यवस्थेसह अन्य कामांची वाढता ताण बघता कारागृहाची प्रशासन व्यवस्थेला मोठे खिंडार पडल्याचे चित्र आहे. अनेक कारागृहात तुरुंगाधिकारी नसल्यामुळे उपलब्ध अधिकाऱ्यांवर अनेक विभागाचा प्रभार देण्यात येत आहे. यामुळे कारागृह प्रशासन व्यवस्था खिळखिळी झाल्याचे दिसते.

**तुरुंगाधिकाऱ्यांची पदे रिक्त**

राज्यात तुरुंगाधिकाऱ्यांची भरती प्रक्रिया 2014 पासून बंद असून राज्यात तुरुंगाधिकाऱ्यांची जवळपास 300 पदे रिक्त आहेत. त्यामुळे उपलब्ध अधिकाऱ्यांवर कामाचा ताण वाढला आहे. तसेच कारागृहांची संख्याही वाढविण्याची गरज आहे. कारागृह विभागात तांत्रिक विभाग असून त्यात कैद्यांचे आरोग्य सांभाळणारे डॉक्टर, परिचालक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, वस्त्रोद्योग, तरूंग उद्योग अधीक्षक, कृषी सहायक अशी जवजवळ 20 प्रकारची पदे आहेत. मात्र, जवळपास 39 टक्के पदे रिक्त असल्याची माहिती समोर.

## भिमजयंती निमित्ताने मोफत इंग्लिश स्पोकन क्लास

**मेहकर :** भिमजयंती ही नाचून साजरी करण्याऐवजी वाचून साजरी होणे अपेक्षित आहे. भिमजयंती दिनी नाचगाणी व मनोरंजनावर खुप मोठा खर्च केला जातो. बहुतांश ठिकाणी भिमजयंती ही डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याच्या विरोधात जाऊन साजरी केली जाते. डिजेच्या तालावर नाचणे, एकच दिवस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन देखावा करणे, मद्यपान करून मिरवणुकीत जाणे हे केवळे आंबेडकरवादी असण्याचे नाटक होय. भिमजयंती साजरी करतांना वैचारिक व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार व कार्याला अनुसरून साजरी होणे आवश्यक आहे. समाजातील गरजु घटकांना शिक्षण, आरोग्य व रोजगार उपलब्ध करून देणे किंवा त्यासाठी मदत करणे हेच भिमजयंती साजरी करण्याचा उद्देश असायला पाहिजे. म्हणून सामाजिक जाणीव ठेवून समाज एकता अभियानच्या माध्यमातून विर इस्टिट्युटने आर्थिक कमकुवत महिलांसाठी ऑनलाइन इंग्लिश स्पोकन मोफत शिकवण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच आज अनेक रोजगार हे केवळ इंग्लिश बोलण्यावर आधारित असल्याने या मोफत इंग्लिश स्पोकन क्लासचा फायदा पाचवीपर्यंत शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या आई, खाजगी नोकरी शोधत असताना इंग्लिश स्पोकनची अडचण ठरत असलेल्या महिला घेऊ शकतात. या क्लासमध्ये प्रवेश घेण्यासाठी विनोद सदावर्ते 9130979300 या नंबर वर संपर्क साधावा. नाच गाण्यावर खर्च केल्यापेक्षा समाजाच्या हितासाठी पैसा खर्च झाला तर खऱ्या अर्थाने भिमजयंती साजरी झाल्याचे सार्थक होईल.

## रेल्वे मालवाहतुकीतील कार्यक्षमतेत वाढ



**अकोला :** भारतीय रेल्वेच्या मालवाहतुकीतील सक्षमीकरणासाठी हाती घेतलेल्या मिशन तीन हजार मेट्रिक टन योजनेंतर्गत भुसावळ विभागाची कामगिरी उत्तम ठरली. यांत्रिक विभागात मालगाडी परीक्षण यार्ड आणि 'आरओएच डेपो'मध्ये मालवाहतूक वॅगनची देखभाल व परीक्षण वेगाने पूर्ण केल्याने मालगाड्यांची कार्यक्षमता आणि विश्वासार्हता वाढली आहे. भुसावळ कॅरेज आणि वॅगन विभागाने मालगाड्यांच्या देखभालीत ऐतिहासिक टप्पा गाठला. मार्च 2025 मध्ये सर्वाधिक एकूण 702 वॅगनचे आरओएच यशस्वीरीत्या पूर्ण केले. ही संख्या फेब्रुवारी 2025 मध्ये झालेल्या 521 वॅगनच्या तुलनेत 34.7 टक्के अधिक असून, मार्च 2024 मध्ये झालेल्या 441 वॅगनच्या तुलनेत 59.1 टक्के वाढ झाली. भुसावळ विभागातील 'कंटिन्युअस चेक' (सी.सी.) मालगाडी रेक संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. मार्च 2024 मध्ये 133 असलेली सी.सी. मालगाडी रेक संख्या मार्च 2025 मध्ये 238 वर पोहोचली. त्यात 78.94 टक्के वाढ दर्शवते. त्यामुळे मालगाड्या मालवाहतुकीसाठी उपलब्ध होऊन रेल्वेच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ झाली. वर्ष 2024-25 मध्ये एकूण 1689 सी.सी. मालगाडी रेक परीक्षण पूर्ण केले. याच्या तुलनेत 2023-24 मध्ये 1271 सी.सी. रेक परीक्षण झाले. ही वाढ 32.88 टक्के अधिक आहे. रेल्वे वाहतूक सुधारण्यासोबतच उत्पन्नात भर घालून मालवाहतूक वॅगनच्या देखभालीत नवीन मापदंड प्रस्थापित करण्यास मदत झाली. भुसावळ विभागामार्फत बडनेरा-शेगाव खंडातील बडनेरा ते कुरुम स्थानकांदरम्यान अप व डाउन लाईनवर स्वयंचलित सिग्नल प्रणाली कार्यान्वित करण्यासाठी पूर्व-नॉन इंटरलॉकिंग व नॉन-इंटरलॉकिंग विशेष ब्लॉक घेतला जात आहे. या अंतर्गत 3 एप्रिल (गुरुवार) रोजी नॉन-इंटरलॉकिंग ब्लॉक कार्यान्वित करण्यात येईल. गाडी क्रमांक 61115 बडनेरा ते अमरावती मेमू, गाडी क्रमांक 61107 अमरावती ते वर्धा मेमू, गाडी क्र. 61108 वर्धा ते अमरावती मेमू, गाडी क्र. 61116 अमरावती ते बडनेरा मेमू 3 एप्रिल रोजी रद्द करण्यात येत आहे.

## शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापनाने सोडला सुटकेचा निश्वास

### अखेर 'तो' निर्णय रद्द

**वर्धा :** राज्य शासनाने आज घेतलेला निर्णय राज्यातील मोठ्या वर्गास दिलासा देणारा आहे. अर्थात नेहमी किंवा जवळपास रोजच काही तरी निर्देश देणाऱ्या शिक्षण खात्याबाबत हे घडले आहे. आजचा निर्णय शिक्षकांच्या भूमिकेस योग्य ठरवितो, अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

2025-26 या वर्षापासून मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी शाळा व्यवस्थापन समिती करणार, असा निर्णय सत्तेवर येताच नव्या सरकारने 20 डिसेंबर 2024 रोजी घेतला होता. त्याचा निर्णय आज जारी करण्यात आला आहे.

मागील वर्षी असंख्य विद्यार्थ्यांना वेळेवर गणवेश मिळू शकला नव्हता. शिक्षक व पालक संघटनांनी त्यावर टीकेचे आसूड ओढले होते. आधी शासनाकडून कापड खरेदी करायची व त्याचे वितरण शाळांना करायचे आणि शाळा व्यवस्थापनाने स्थानिक पातळीवार शिवून घ्यायचे असे ठरले होते. आता तसे आज प्रसिद्ध झालेल्या शालेय शिक्षण मंत्रालयाच्या निर्देशांनुसार, केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा व राज्य शासनाच्या मोफत गणवेश योजनेची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीवर राहणार. त्याची रक्कम समितीच्या बँक खात्यात जमा होणार. गणवेश रंग व रचना समिती निश्चित करणार. दोन पैकी एक गणवेश स्काउट गाईड संस्थेने निश्चित केलेल्या रंग संगतीप्रमाणे खरेदी करण्याचे अधिकार आजच्या निर्णयाने शाळा समितीस प्राप्त झाले आहे. शाळा व्यवस्थापन समिती निर्णयक ठरणार गणवेश कापड हे चांगल्या दर्जाचे, त्वचेला इजा न करणारे असावे. कापड 100 टक्के पॉलिस्टर नसावे. शिक्षणाधिकारी यांनी त्याची तपासणी करावी. महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेस याची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या निर्णयामुळे शाळा व्यवस्थापन समिती आता निर्णयक ठरणार आहे. केंद्र शासनाने निश्चित केलेली गणवेश रक्कम व राज्य शासनाच्या मोफत गणवेश योजनेची रक्कम ही शाळा व्यवस्थापन समितीच्या खात्यावरच जमा होणार आहे. वर्ग पहिला ते वर्ग आठवा यातील मुलामुलींसाठी ही योजना राबवण्यात येते. शासनाने केलेला बदल हा शिक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समिती संघटनानी स्वागतार्ह ठरवला आहे.



**शिक्षक समितीचे म्हणणे काय?**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती या संघटनेचे राज्याध्यक्ष विजय कोंबे म्हणतात की, 'एक राज्य, एक गणवेश' शासन निर्णय रद्द करून शाळा व्यवस्थापन समितीला गणवेशाचा रंग ठरवण्यासह खरेदी प्रक्रिया राबवण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या शासन निर्णयाचे स्वागत असून जुनी पद्धती कायम ठेवल्याबद्दल शालेय शिक्षण विभागाचे आभार.

बहुजन सौरभ
बहुजन सौरभ
वाचकांना आवाहन
आम्ही वाचतो, तुम्हीपण वाचा!



११ एप्रिल राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले, १४ एप्रिल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व ५ एप्रिल सम्राट अशोक यांच्या संयुक्त जयंतीप्रित्यर्थ

आपल्या शुभेच्छा व जाहिराती खालील पत्यावर पाठवाव्यात.

जाहिरात दरपत्रक

| | | |
|---|---|---|
| पान एक | - पूर्ण पान | - ६० हजार रूपये |
| सप्तरंगीन | - अर्ध पान | - ३० हजार रूपये |
| | - पाव पान | - १५ हजार रूपये |
| अंतिम पान | - पूर्ण पान | - ५० हजार रूपये |
| सप्तरंगीन | - अर्ध पान | - २५ हजार रूपये |

शुभेच्छा जाहिरात २००० रू. पासून

:: दैनिक बहुजन सौरभ कार्यालय ::
१/२, स्वराज कॉलनी, अजनी पोलिस स्टेशनजवळ, वंजारीनगर, पाण्याच्या टाकीजवळ, मेडिकल कॉलेज मागे, तुकडोजी महाराज पुतळा मार्ग, नागपूर-४४००२४
मेल -bahujansaurabh@gmail.com
संपर्क - 7020149291, 9422860648, 9421588901

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648